सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १८ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सद्गुरुंच्या ईशा फाउंडेशन विरोधातील खटला बंद सर्वोच्च न्यायालयाने दिली महत्त्वाची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ नवी दिल्ली**

दोन मुलींना ओलीस ठेवल्याप्रकरणी सद्गुरू जग्गी वासुदेव यांच्या ईशा फाऊंडेशनविरुद्धचा खटला सर्वोच्च न्यायालयाने बंद केला आहे. कोइम्बतूर येथील ईशा फाऊंडेशन परिसरात आपल्या दोन मुलींना ओलीस ठेवल्याचा आरोप करत एका व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की, दोन्ही मुली प्रौढ आहेत आणि त्यांनी स्वेच्छेने, कोणत्याही दबावाशिवाय आश्रमात राहत असल्याचे म्हटले आहे.

ईशा फाऊंडेशनचे संस्थापक आणि प्रमुख सद्गुरु जग्गी वासुदेव यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. ईशा फाऊंडेशनच्या आवारात आपल्या दोन मुलींना ओलीस ठेवल्याचा आरोप करणाऱ्या एका व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने शुक्रवारी सुनावणी बंद केली. सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने म्हटले की, मद्रास उच्च न्यायालयाने अशा याचिकेवर चौकशीचे आदेश देणे योग्य नाही. पोलिसांनी आश्रमावर टाकलेला छापाही चुकीचा होता. दोन्ही मुली प्रौढ असल्याचे न्यायालयाने सांगितले. जेव्हा त्या आश्रमात



गेल्या, तेव्हा दोघीही २७ आणि २४ वर्षांच्या होत्या. त्या स्वतःच्या इच्छेने आश्रमात राहत आहेत. या निर्णयाचा परिणाम या प्रकरणापुरता मर्यादित राहील, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाला सद्गुरूंनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले

निवृत्त प्रोफेसर एस कामराज यांनी फाऊंडेशनच्या विरोधात मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. कामराज यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या हेबियस कॉर्पस याचिकेत आपल्या मुली लता आणि गीता यांना ईशा फाऊंडेशनच्या आश्रमात ओलिस ठेवण्यात आल्याचा आरोप केला होता. यानंतर हायकोर्टाने आश्रमाविरोधात चौकशीचे आदेश दिले होते. मद्रास उच्च न्यायालयाने ३० सप्टेंबर रोजी सांगितले होते की, पोलिसांनी ईशा फाऊंडेशनशी संबंधित सर्व गुन्हेगारी प्रकरणांचे तपशील सादर करावेत.

**CJI दोन्ही मुलींशी बोलले**

दुसऱ्या दिवशी, म्हणजे १ ऑक्टोबरला सुमारे १५० पोलिस तपासासाठी आश्रमात पोहोचले. उच्च न्यायालयाच्या आदेशाला सद्गुरूंनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर ३ ऑक्टोबरला सर्वोच्च न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाच्या फाउंडेशनविरुद्ध पोलिस तपासाच्या आदेशाला स्थगिती दिली होती. दरम्यान, या प्रकरणावर टिप्पणी करताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी दोन्ही तरुणींशी चर्चा केल्यानंतरच आदेश जाहीर केला. सरन्यायाधीशांशी चर्चेदरम्यान, मुलींनी आश्रमात स्वत:च्या इच्छेने राहत असल्याचे सांगितले.

## बच्चू कडू तिसऱ्या आघाडीतून बाहेर पडत 'वर्षा' वर सरेंडर होतील - राणांना पूर्ण विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती**

बच्चू कडुंनी नवनीत राणांना पाडायची सुपारी घेतली होती, या शब्दांत हल्लाबोल आमदार रवि राणा यांनी केलायं. दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे उमेदवार म्हणून रवि राणा यांचे अमरावतीत बॅनर झळकत आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने राणा यांच्याकडून अमरावतीत जोरदार तयारी सुरु आहे. राणा यांनी अमरावतीत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी बच्चू कडू यांचं थेट नाव घेत हल्लाबोल चढवलायं.



रवि राणा म्हणाले, बच्चू कडे हे महायुतीतच होते, शिंदे गटातील आमदारांसोबत ते गुवाहाटीला गेले होते, त्यावेळी अचलपूरच्या जनतेला विचारुन गेले नव्हते. गुवाहाटीत खोक्याचं बिल झालं ते जनतेला विचारुन झालं नव्हतं. महायुतीत असताना त्यांनी मंत्रिपद भोगलंय, आजही त्यांना कॅबिनेटचा दर्जा आहे. महायुतीत असताना मंत्रिपद घेणे, खोक्याचं राजकारण करणे, भ्रष्टाचार करणे, तडजोडी करणे हे महायुतीत होते तेव्हा चालत होतं, असा मोठा गौप्यस्फोट राणा यांनी केलायं.

तसेच लोकसभा निवडणुकीत बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्याविरोधात डमी उमेदवार केला होता. या निवडणुकीदरम्यान, कडू आणि इतरांमध्ये देणं घेणं झालंय, हे सर्वांना माहिती आहे. बच्चू कडूंनी लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांना पाडायची सुपारी घेतली होती. त्यामुळे राणा यांना कोणी पाडलं हे मला वेगळं सांगण्याची गरज नसल्याचं रवि राणा यांनी स्पष्ट केलंय.

आम्ही पूर्ण ताकदीने काम करताना भाजपच्या कमळाच्या उमेदवाराला विरोध करणारा बच्चू कडू असून त्यांनी डमी उमेदवार उभा करुन त्यांनी नवनीत राणांना पाडलं, आता पुढील काळाच अचलपूरची जनता बच्चू कडूला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशाराही रवि राणा यांनी बच्चू कडू यांना दिलायं.

## ११५ जणांच्या नावांची शिफारस, दिल्लीत बैठकांचे सत्र

### आज किंवा उद्या भाजपाची पहिली यादी येणार?



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहेत. आचारसंहिता लागू होताच राज्यातील राजकारणाला वेग आला आहे. यातच महाराष्ट्रातील भाजपा नेत्यांकडून केंद्रातील नेतृत्वाला सुमारे ११५ जणांच्या नावांची यादी सादर केल्याची माहिती मिळाली आहे. यासंदर्भात एक बैठक होणार असून, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे दिल्लीला जाण्याची शक्यता आहे.

महायुतीच्या जागावाटपाची चर्चा अद्यापही सुरू आहे. भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट नेमक्या किती जागा लढणार, याबाबत स्पष्टता झाल्याचे पाहायला मिळत नाही. परंतु, यातच आता भाजपाच्या गोटात हालचालींना वेग आला असून, विद्यमान आमदार, भाजपा समर्थक अपक्ष आमदार यांच्या मतदारसंघातील आढावा घेण्यात आला आहे. यानंतर आता सुमारे १०० ते ११५ जणांच्या नावांची शिफारस राज्यातील भाजपाने केंद्रीय नेतृत्वाला केल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## उद्धव ठाकरेंना 'मविआ'समोर कटोरा घेऊन फिरावे लागतेय, चंद्रशेखर बावनकुळेंची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८पुणे**

उद्धव ठाकरेंची अवस्था पाहून कीव येते. आज त्यांना महाविकास आघाडीसमोर कटोरा घेऊन फिरावं लागतं आहे. अशा अवस्थेत मी त्यांना यापूर्वी कधीच पाहिलं नाही. शरद पवारांना जो गेम करायचा होता, तो त्यांनी केला अन् दिवंगत बाळासाहेब ठाकरेंनी मजबुतीने बनवलेली भाजप-शिवसेनेची युती तोडली आणि उद्धव ठाकरेंना आमच्यापासून दूर नेले, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

पुण्यात एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, आता शरद पवारांच्या नजरेत उद्धव ठाकरेंची उपयुक्तता संपली आहे. उद्धव ठाकरेंची अवस्था पाहून त्यांची कीव येते. त्यांना काँग्रेसच्या आणि शरद पवारांच्या घरी चकरा माराव्या लागत आहेत. पूर्वी मातोश्रीवर चर्चा व्हायच्या, पण आज उद्धव ठाकरे या लोकांच्या घरी जातात. मातोश्रीची एक इमेज होती, ती



उद्धव ठाकरेंनी गमावली. काँग्रेस कधीच उद्धव ठाकरेंना पसंत करत नाही. त्यांची अवस्था शोले चित्रपटासारखी झाली आहे. 'आधे इधर, आधे उधर, मेरे साथ कोई नहीं. बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की, ज्या दिवशी मला काँग्रेसकडे जाण्याची वेळ येईल, त्या दिवशी मी माझी शिवसेना बंद करेल. आज उद्धव ठाकरे काँग्रेसच्या घरी चकरा मारताहेत. आम्ही त्यांच्यासोबत युतीत होतो, त्यामुळे त्यांची ही अवस्था पाहवत नाही, अशी बोचरी टीका त्यांनी यावेळी केली.

ते पुढे म्हणतात, नाना पटोलेंनी स्वतःला मुख्यमंत्री घोषित केले, जयंत पाटील स्वतःला मुख्यमंत्री घोषित करत आहेत, वड्डेटीवारही स्वतःला मुख्यमंत्री घोषित करतात. शरद पवारांच्या मनात तर त्यांच्या मुलीला म्हणजेच, सुप्रिया सुळेंना मुख्यमंत्री करायचे आहे. उद्धव ठाकरे राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत. तुम्ही त्यांना नेता मानत असाल, तर पटोले आणि इतरांची हिम्मत कशी होते स्वतःला मुख्यमंत्री म्हणवून घेण्याची. उद्धव ठाकरे माजी मुख्यमंत्री आहेत, शरद पवार किंवा काँग्रेस का त्यांना मुख्यमंत्री घोषित करत नाही. त्यांची गरज संपली आता. जे षडयंत्र रचायचे होते, ते रचले आणि आमची इतक्या वर्षांची युती तोडली, अशी टीकाही बावनकुळेंनी यावेळी केली.

## आमच्या मतदारांची नावे यादीतून वगळण्याचं भाजपा-शिंदे सेनेचं षडयंत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

विधानसभा निवडणूक निष्पक्ष व पारदर्शक झाली पाहिजे, मतदान वाढले पाहिजे असे निवडणूक आयोग सांगत असते पण निवडणूक आयोगाच्या कामातच पारदर्शकता व निष्पक्षपातीपणा दिसत नाही. सत्ताधारी पक्षाच्या इशाऱ्यावर अधिकारी काम करत आहेत. ऑनलाईन फॉर्म ७ च्या माध्यमातून मविआच्या मतदारांची नावे मोठ्या प्रमाणात मतदार यादीतून वगळली जात आहेत. यामागे एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस आहेत असा गंभीर आरोप करून रडीचा डाव खेळू नका, हिंमत असेल तर आमने सामने लढा असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. मविआनं आज पत्रकार परिषद घेत मतदार यादीतील



घोळावर गंभीर आरोप केले आहेत.

शिवालय येथे झालेल्या पत्रकार परिषदेत नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्ष व त्यांचे सहकारी पक्ष पराभवाच्या भितीने षडयंत्र करत आहेत. निवडणूक आयोग मोदीशाह यांच्या इशाऱ्यावर काम करत आहे. हे लोकशाहीला काळीमा फासणारे आहे. आयोगाच्या कामात सरकारचा हस्तक्षेप होता कामा नये. सरकारी योजनांची माहिती देण्याच्या नावाखाली राज्यात ५० हजार योजना दूतांना ५० हजार रुपयांवर नियुक्त केले असून हे योजनादूत भाजपा विचारांचे आहेत व ते भाजपाचा प्रचार करत आहेत. जनतेच्या पैशाने सुरु असलेला हा भाजपचा प्रचार तात्काळ बंद करा अशी मागणी त्यांनी केली. त्याशिवाय पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची नियुक्ती व त्यांना दिलेली मुदतवाढ ही असंवैधानिक व बेकायदेशीर आहे. त्यांना हटवण्याची मागणी काँग्रेसने केली पण त्यांना बदलू शकत नाही असं आयोग सांगतं पण याच निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालच्या निवडणुकीवेळी मात्र तिथल्या पोलीस महासंचालकांना बदलले. पश्चिम बंगाल व महाराष्ट्रासाठी वेगळे कायदे आहेत का? असा प्रश्न पटोलेंनी उपस्थित केला.

## 'ते' आंदोलन म्हणजे घरचं सत्यनारायण नव्हतं दाखल गुन्हे मागे घ्या, राज ठाकरेंची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टोल नाका आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी केली आहे. मनसे आंदोलकांनी केलेली आंदोलने लोकांसाठी होती. आज मला वाटतं सगळेच जन खुश असतील. इतकी वर्ष आपल्यावर जी काय टोलधाड पडली होती, त्याला डकैती म्हणता येईल. किती पैसे आले? किती जमा झाले, कोणाकडे आले, काय झालं. कशाचाच कशाला पत्ता नव्हता, अशी टीका देखील राज ठाकरे यांनी केलीय.



इतक्या वर्षांच्या आमच्या आंदोलनाला हे यश मिळालं आहे. याबद्दल राज ठाकरे यांनी सर्व मनसैनिकांचं अभिनंदन देखील केलीय. तेव्हाही केलं अन् आताही करतोय, हे सगळं मनसे सैनिकांमुळे शक्य झाल्याचं राज ठाकरे म्हणाले आहेत. टोलनाक्यांवर आंदोलन केल्याप्रकरणी मनसेच्या अनेक कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल झाला होता. यावरून राज ठाकरे यांनी मनसे आंदोलकांवर टोलनाक्यासंदर्भात दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची देखील विनंती केलीय.

## तिढा सोडवण्यास राज्यातील काँग्रेस नेते सक्षम नाहीत, राहुल गांधींशी चर्चा करणार : संजय राऊत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

विदर्भ हा महाराष्ट्राचा भाग आहे, ते काय स्वतंत्र नाही. विदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदारही जिंकले आहेत. शिवसेनेचे खासदार जिंकले आहेत. रामटेकसारखी सहा वेळेला निवडून आलेली जागा आम्ही काँग्रेसला दिली आहे. अमरावतीची आमची हक्काची जागा आम्ही काँग्रेसला दिली. त्या बदल्यात आम्ही विधानसभेला काही अपेक्षा ठेवल्या तर त्यात चुकीचे असे काही मला वाटत नाही, अशी स्पष्ट भूमिका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी



मांडली. ते पत्रकारांशी बोलत होते.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहेत. आचारसंहिता लागू होताच राज्यातील राजकारणाला वेग आला आहे. महाविकास आघाडीची विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाची चर्चा पुन्हा सुरू झाली. आतापर्यंत एकूण २८८ जागांपैकी २६० जागांचे वाटप पूर्ण झाले असून, यातील १०० जागा काँग्रेसला, तर उद्धव सेना आणि शरद पवार गटाला प्रत्येकी ८० जागा देण्यावर आघाडीतील नेत्यांनी शिक्कामोर्तब केले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. उर्वरित २८ मित्र पक्षांसाठी सोडण्यात आल्या असून त्यावर दोन पक्षांनी दावा सांगितल्याने तो तिढा कायम असल्याचेही सांगण्यात आले. यासंदर्भात पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊत यांनी महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांवर तीव्र नाराजी व्यक्त करत आता राहुल गांधी यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितले.

मुकुल वासनिक, रमेश चेन्नीथला, केसी वेणूगोपाल यांच्याशी चर्चा झाली. राहुल गांधी यांच्याशी बोलणार आहे. तिढा असलेल्या जागांवर लवकर मार्ग काढावा, असे आम्ही म्हणत आहोत. राष्ट्रवादी आणि शिवसेनेमध्ये जास्त मतभेद नाहीत. काँग्रेसचे राज्यातील नेते तिढा असलेल्या जागावर मार्ग काढण्यास सक्षम दिसत नाहीत. ते म्हणतात की, हायकमांडशी चर्चा करावी लागेल. आता वेळ फार नाही. वेगाने चर्चा व्हावी. त्यामुळे आम्ही काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना सांगितले आहे की, लवकर निर्णय घ्यावा आणि जागा वाटप जाहीर करावे, असे संजय राऊत यांनी ठामपणे म्हटले आहे.

## टोलमाफी झाल्याने एसटीची दररोज दोन लाखांची बचत दोन हजार फेऱ्या करणाऱ्या गाड्यांना फायदा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

मुंबईच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल नाक्यांवर हलक्या वाहनांना टोलमाफी केली आहे. या हलक्या वाहनांमध्ये एसटी गाड्यांचाही समावेश आहे. या टोलमाफीमुळे एसटीची दररोज सुमारे दोन लाखांची बचत होणार आहे. राज्य सरकारने वाशी, दहीसर, मुलुंड, ऐरोली आणि लालबहादूर शास्त्री या मुंबईच्या प्रवेशद्वारावर आकारण्यात येणाऱ्या टोलमधून हलक्या वाहनांना वगळले आहे. राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या गाड्या राज्यातून मुंबईत ये-जा करतात. या गाड्यांच्या सुमारे दोन हजार फेऱ्या होतात. टोलमाफीचा फायदा या दोन हजार फेऱ्या करणाऱ्या गाड्यांना होणार आहे. त्यामुळे एसटीचे टोलच्या माध्यमातून खर्च होणारे सुमारे २ लाख रुपये दिवसाला वाचणार आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे एसटी महामंडळाला मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

**तिकीट दर कमी करा**

राज्यातून मुंबईत येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या एसटीच्या गाड्यांच्या २००० फेऱ्या होतात. ज्यामध्ये मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या शिवनेरी गाड्यांच्या ३०० फेऱ्यांचा समावेश आहे. एसटीला एका फेरीसाठी साधारण १०० रुपये इतका टोल द्यावा लागतो. टोलच्या माध्यमातून एसटीला दिवसाला सुमारे २ लाख तर महिन्याला ६० लाख रुपयांचा भरावा लागणारा टोल वाचणार आहे. एसटीचा खर्च काही प्रमाणात कमी होणार आहे. त्यामुळे एसटीने प्रवासी तिकीट दरही कमी करावे, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

## संपादकीय ......

# आता महाराष्ट्राचा खटला जनतेच्या न्यायालयात!

अखेर महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. २००९ पासून हरियाणा आणि महाराष्ट्राची निवडणूक सोबत होत होती. यंदा निवडणूक आयोगाने ही परंपरा खंडित केली. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत आहे आणि महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ ला मतमोजणी होणार. तीन दिवसांमध्ये सरकार कसे स्थापन होणार, हा प्रश्न निवडणूक आयोगाला का पडला नसेल बरं? २०१९ मध्ये ऑक्टोबरमध्ये निवडणूक झाली, त्यानंतर पहिलं दीड दिवसांचं सरकार २३ नोव्हेंबरला स्थापन झालं होतं.

त्याच दिवशी यंदा 'निकाल' लागणार आहे. निवडणूक आयोगाचे तीन जंटलमन्स आहेत. त्यातील मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार जेवढं बोलतात आणि त्यांच्या निवेदनात शेरोशायरीची जेवढी पेरणी करतात तेवढा तरी त्यांनी महाराष्ट्रातील २०१९ ते २०२४ पर्यंत रंगलेल्या राजकारणाचा, कोर्टकज्जांचा विचार केला असता तर त्यांच्या लक्षात आले असते, तीन दिवसात महाराष्ट्रात सरकार स्थापन होणे शक्य आहे का?महाराष्ट्रात २०१९ ते २०२४ या पाच वर्षांमध्ये पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. ज्यांनी सोबत निवडणूक लढली ते सोबत येऊ शकले नाहीत. जे विरोधात लढले त्यांनी एकत्र येत पहाटेच शपथ घेऊन दीड दिवसांचे सरकार स्थापन केले. त्यानंतर महाराष्ट्राने कधीही विचार केला नव्हता असे राजकीय मेतकूट जमून आले. ज्यांचे सर्वाधिक आमदार निवडून आले तो पक्ष विरोधी बाकांवर जाऊन बसला आणि ज्यांना जनतेने विरोधात बसायचा कौल दिला ते सरकारमध्ये होते. हे सर्व दोन-अडीच वर्षे चालले.

एकनाथ शिंदे यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरेंनी केली होती. ती नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार उद्धव ठाकरे यांनाच होता. हे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले. ठाकरेंनी नेमलेले सुनील प्रभू हे शिवसेनेचे अधिकृत व्हीप आहेत आणि एकनाथ शिंदेंनी नेमलेले भरत गोगावले यांची पक्ष प्रतोद म्हणून केलेली नियुक्ती बेकायदेशीर असल्याचाही सर्वोच्च निर्णय देण्यात आला होता. पक्षांतर्गत बंडाला घटनात्मक पेचप्रसंग दाखवण्याचा एकनाथ शिंदेंचा प्रयत्न योग्य नाही, असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं होतं. एखाद्या पक्षात बंडखोरी, किंवा नाराजी समोर येत असेल तर त्या आधारावर विधानसभेत बहुमत सिद्ध करण्याचा राज्यपाल भगतसिंह कोश्यारींनी आदेश देणे, हेही सर्वोच्च न्यायालयाने चुकीचे ठरवले होते.महाराष्ट्रात जातीय राजकारणाचेही अनेक कप्पे झाले आहे. प्रत्येकाला आरक्षण पाहिजे. महामंडळ पाहिजे. त्यासाठी विविध समाजांची आंदोलने सुरू आहेत. समाजासमाजामध्ये द्वेषभावना वाढीस लागत आहे. ते आपल्यात आले तर आपले आरक्षण कमी होईल ही भीती प्रत्येक प्रवर्गाला वाटत आहे. त्यामुळे ते भयभीत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने एससी, एसटी वर्गीकरण आणि क्रिमिलिअरचा निर्णय दिला. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाच्या पीठातील एका न्यायाधीशांनी कडाडून विरोध केला. त्यांनी संविधानाचा दाखला त्यासाठी दिला, मात्र बहुमताच्या जोरावर तो निर्णय घेण्यात आला.

महायुती सरकारने महाराष्ट्रात याची अंमलबजावणी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय आचारसंहितेच्या एक दिवस आधी घेतला. त्यासोबतच विधान परिषदेचे राज्यपाल नियुक्त आमदारांचा निर्णयदेखील तसाच घाईघाईत घेण्यात आला. त्यालाही ठाकरेंनी स्थगितीची मागणी केली ती मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. प्रत्येक ठिकाणी कोंडी, अडवणूक, विलंब करून न्याय नाकारला जात असताना जनतेचं न्यायालय काय निर्णय घेतं याची वाट २३ नोव्हेंबरपर्यंत पाहावी लागणार आहे.

## श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात

# पृथ्वी विज्ञान सप्ताह साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती:** श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी पृथ्वी विज्ञान सप्ताह उत्साहात साजरा केला. या दोन दिवसीय सप्ताह मध्ये १४ ऑक्टोबर २०२४ रोजी भूगर्भशास्त्र (ज्युओलॉजी) आणि भू-माहिती (जिओ-इन्फार्मेटिक्स) संघटनेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. चंद्रकांत भोयर, प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्था, अमरावती विभाग यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. राजेश टी. सावळे, ज्येष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्था, अमरावती आणि डॉ. इम्रान शेख, जिल्हा खाण अधिकारी, खाण विभाग, कलेक्टर कार्यालय, अमरावती हे लाभले. त्याचप्रमाणे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. पी. ए. नागपुरे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती हे देखील कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. एम. एम देशमुख, विभाग प्रमुख, भूगर्भशास्त्र व भुमाहिती विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांनी केले.उपस्थित सर्व मान्यवरांनी पृथ्वी विज्ञान सप्ताहातील पृथ्वी विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केले. प्रदर्शनामध्ये बी.एस.सी १, २, व ३ आणि एम.एस.सी. भाग १ व २ मधील एकूण ५४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या



मध्ये विद्यार्थ्यांनी भूगर्भशास्त्र आणि भुमाहिती विषयावर आधारित विविध मॉडेल्स, नाविण्यपूर्ण पोस्टर्स आणि खेळांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणांचे कौतुक करत मान्यवरांनी भूगर्भशास्त्र व भुमाहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या संधी आणि संशोधनाच्या संधी यावर मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय प्रदर्शनामध्ये विविध विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. हे प्रदर्शन विशेषतः ८ वी ते १२ वी तील विद्यार्थ्यांमध्ये भूगर्भशास्त्र व भू-माहिती तंत्रज्ञानाबद्दल जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आले होते, ज्यात अमरावती शहरातील विविध शाळा व विद्यालयांनी सहभाग नोंदवला. प्रदर्शनाला एकूण ५१० विद्यार्थ्यांनी भेट दिली आणि या विषयाची ओळख करून घेतली.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांनी देखील प्रदर्शनाला भेट दिली व प्रदर्शनामध्ये मिळालेला अनुभव घेऊन या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधी आणि संसाधनांचा उपगोय करून भविष्याच्या दृष्टीने वाटचाल करण्यास आवाहन केले. प्रदर्शनात विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ झाला आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन कू. नंदिनी दुर्गे यांनी केले, तर मान्यवरांचे आभार कु. रुचिता पांडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या आयोजनात श्री. एस. के. पौनिकर, सहायक प्राध्यापक, श्री संजय सालबर्डे, प्रयोगशाळा परिचर, आणि भूगर्भशास्त्र व भू-माहिती विभागातील शिक्षकवर्ग - श्री. के. पी. तिवारी, श्री. जी. के. कडू, कु. ए. एस. उके, कु. एस. डी. सरडे, कु. एम. जी. चव्हाण, कु. नंदिनी भुंबर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मानाच्या माजी राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर मराठी वक्तृत्व स्पर्धेत अमरावती विद्यापीठाला प्रथम बक्षीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे आयोजित मानाची माजी राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर आंतर विद्यापीठ मराठी वक्तृत्व स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले. सदर स्पर्धा १० ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची विद्यार्थिनी कु. श्रावणी रोटे हिने प्रथम क्रमांक पटकाविला. कु. श्रावणी ही अमरावती शहरातील सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून तिचे इंग्रजी, मराठी व हिंदी या तिन्ही भाषेवर लीलया प्रभुत्व आहे. कु. श्रावणीच्या या घवघवीत यशाबद्दल कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांनी तिचा सत्कार केला. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.






## लाल मिरची खाणे पडू शकते महागात

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

भारतीयांचे जेवण लाल-तिखटाशिवाय होणे तसे कठीणचं ! कोणतीही भाजी किंवा विशिष्ट पक्वान बनवताना आपण तिखटाचा वापर करतोच. त्याऐवजी झणझणीत भाजी तयार होणे अशक्य असे म्हणणे चुकिचे ठरणार नाही. या लाल तिखटामध्ये लाल मिरचीचा वापर केला जातो. ज्यामुळे पदार्थाला विशिष्ट चवही येते आणि रंगही येतो. हल्ली तर लाल मिरचीचे टॉपिंग पिझ्झा-पास्तावर टाकून खाण्यात येते. पण, ही झणझणीत लाल मिरची जास्त प्रमाणात खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. डॉक्टरही, जास्त तिखट खावू नये असा सल्ला देतात कारण लाल मिरचीच्या सेवनाने आरोग्याशी संबधित अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे निरोगी आरोग्यासाठी लाल मिरची प्रमाणात खाणेच योग्य समजले जाते. असे असले तर लाल मिरची जास्त प्रमाणात खाणे कसे महागात पडू शकते पाहूयात,

पोटावर परिणामकारक -लाल मिरचीमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात, ज्यात कॅप्साइन नावाचा पदार्थही आढळतो. या पदार्थाच्या सेवनाने पोटामुळे जळजळ जाणवते आणि आतडंयानाही त्रास जाणवतो. परिणामी, तुम्हाला वारंवार अपचन, गॅस, पोटदूखी जाणवते. लाल मिरची तिखट असते, त्यामुळे तिखट पदार्थ खाल्याने पोटात अल्सर होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे जास्त तिखट पदार्थ खाणे टाळा.

लाल मिरचीच्या सेवनाने तोंड, डोळे आणि शरीराच्या आतील भागात जळजळ जाणवू शकते. तसेच जास्त तिखट खाल्याने डोळ्यांना त्रास होऊ शकतो, डोळ्यांतून पाणी येवू शकते. ज्यामुळे डोळ्यांच्या विविध समस्या जाणवू शकतात.



मानसिक आरोग्यावर होतो परिणाम - लाल मिरची खूप जास्त प्रमाणात खाल्लाने मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. तुम्हाला ताण, तणावाच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते.

**उष्णता वाढते** -लाल मिरचीच्या अतिसेवनाने शरीरातील उष्णता वाढू शकते कारण लाल मिरची निसर्गतः उष्ण असते.ऍलर्जी -अनेकांना कोणत्यातरी गोष्टीची ऍलर्जी असते, तुम्हाला जर तिखटाची ऍलर्जी असेल तर तुम्ही लाल मिरचीचे सेवन टाळायला हवे. अशा परिस्थितीत, जर ऍलर्जी असेल आणि लाल मिरची तुम्ही खाल्लीत तर त्वचेवर खाज येणे, रॅशेस अशा समस्या जाणवू शकतात.

# परभणी कृषी विद्यापीठाकडून मर रोगास प्रतिबंधक हरभऱ्याचे नवीन वाण विकसित

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक**

केंद्रीय बियाणे अधिनियम, १९६६ नुसार भारत सरकारने केंद्रीय बियाणे समितीच्या शिफारसीनुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश भारताच्या राजपत्रात करण्यात आला. याबाबत दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने अधिसुचना प्रसिध्द केली असुन राजपत्राचा नोंदणीकृत क्रमांक एसओ ४३८८ (अ) हा आहे. सदर पाच वाणात विद्यापीठ विकसित हरभऱ्याचा परभणी चना - १६ (बीडीएनजी २०१८-१६) या वाणाचा समावेश आहे.देशाच्या राजपत्रात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिक वाणांचा समावेश केल्यामुळे या वाणांचा प्रचार व प्रसार मोठया प्रमाणावर होण्यास मदत होवून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नत्ती साधता येईल असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि म्हणाले.देशाच्या राजपत्रात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिक वाणांचा समावेशामुळे सदरील वाणांचे बीजोत्पादन हे मुख्य बीजोत्पादन साखळीमध्ये घेता येणार असल्याची माहिती संशोधन संचालक तथा मुख्य शास्त्रज्ञ डॉ. खिजर बेग यांनी दिली.




परभणी चना - १६ (बीडीएनजी २०१८-१६) वाणाची वैशिष्ट्ये

१) हा वाण विद्यापीठ अंतर्गत असलेल्या बदनापुर येथील कृषि संशोधन केंद्राने विकसित केला आहे. २) हा वाण महाराष्ट्र राज्यासाठी प्रसारीत करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

३) या वाणापासून सरासरी पेक्षा अधिक उत्पादन देणारा वाण असून ११० ते ११५ दिवसात परिपक्व होतो.

४) मर रोगास प्रतिबंधक असून दाणे टपोरे आहेत.

५) १०० दाण्याचे वजन २९ ग्रॅम भरते.

६) या वाणावर किडींचा प्रादुर्भाव तुल्यबळ वाणापेक्षा कमी होतो

# मान्सून परतला तरीही राज्यात ठिकठिकाणी पडतोय पाऊस! काय आहेत हवामानाचे इशारे?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** राज्यात आता नैऋत्य मान्सूनच्या पावसाने आपली रजा घेतली आहे. परतीचा पाऊसही संपला आहे, पण राज्यात अजून मोठ्या प्रमाणावर पाऊस पडताना दिसत आहे. कारण नैऋत्य मान्सून संपला असला तरी ईशान्य मान्सूनच्या पावसाला तामिळनाडू आणि परिसरामध्ये सुरूवात झालेली आहे. पण राज्यात पुढील चार दिवस पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

दरम्यान, मान्सून परतला तरी राज्यात पडणारा पाऊस हा बंगालच्या उपसागरामध्ये तयार होणाऱ्या वाऱ्यामुळे आणि उष्णतेमुळे पडत असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तर येणाऱ्या चार दिवसांत राज्यातील काही जिल्हे वगळता सर्वच जिल्ह्यामध्ये चांगला पाऊस पडणार आहे.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, १८ ऑक्टोबर रोजी पालघर, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, जालना, जळगाव, बुलढाणा, अकोला, नागपूर आणि भंडारा हे जिल्हे वगळता सर्वच जिल्ह्यामध्ये पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर १९ ऑक्टोबर



आणि २० ऑक्टोबर रोजी विदर्भातील काही जिल्हे, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्हे वगळता उर्वरित जिल्ह्यांमध्ये येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर २१ ऑक्टोबर रोजी पावसाचा जोर काहीसा कमी होणार असून केवळ मध्य महाराष्ट्राच्या मध्य बिंदूच्या आसपासच्या जिल्ह्यांत पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १८ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# अचलपूर मध्ये काँग्रेस पक्षा ला खिंडार

## काँग्रेस च्या मोठ्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

### खासदार ,जिल्हाध्यक्षावर नाराजी !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अचलपूर :** अचलपूर विधानसभा क्षेत्रातील निवडणुकीपूर्वी काँग्रेसमध्ये मोठा संघर्ष पाहायला मिळत आहे. येथे सेवा दल शहर अध्यक्ष शेख कदीर पहलवान शेख महेबूब आणि अल्पसंख्याक काँग्रेस शहर अध्यक्ष नईम खान युसूफ खान यांनी कार्यकर्त्यांसह राजीनामा दिल्यामुळे शहर काँग्रेसमध्ये खळबळ उडाली आहे.

राज्यात विधान सभा निवडणुकीचे वारे वाहत असतांना एकीकाळी काँग्रेस पक्षाचा गड असलेल्य अचलपुरात काँग्रेस पक्षाला खिंडार पडली आहे . काँग्रेस चे शहरातील पदाधिकारी तसेच मतपरिवर्तन करणारे नेते म्हणून ओळख असणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी पक्ष श्रेष्टीवर नाराजी व्यक्त करत राजीनामा दिल्याने चर्चा ला उधान आले आहे . या दोन्ही पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की काँग्रेस फक्त अल्पसंख्याक मतांवर राजकारण करते, पण जेव्हा प्रतिनिधित्व किंवा काम करण्याचा विषय येतो, तेव्हा काहीच करत नाही डावलण्यात येते .दोघांनी सांगितले की, खासदार बळवंत वानखेडे आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना अनेकदा निवेदन दिले, परंतु त्यांनी प्रत्येक निवेदनाला दुर्लक्ष केले आणि शहरातील विविध कामांबाबतच्या निवेदनांना गांभीर्याने घेतले नाही. याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही. शेख कदीर पहलवान यांनी सांगितले की, अनेकदा कामांबाबत निवेदन दिल्यानंतरही काँग्रेसचे उच्च अधिकारी, स्थानिक नेते, खासदार आणि जिल्हाध्यक्ष यांनी याकडे लक्ष दिले नाही.या सर्व गोष्टींमुळे नाराज होऊन दोन्ही नेत्यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. . त्यांच्या



राजीनाम्यामुळे काँग्रेसमध्ये खळबळ उडाली आहे आणि आगामी निवडणुकीत याचा थेट परिणाम दिसून येईल. तरीही, दोघांनी अजूनही स्पष्ट केले नाही की ते कोणत्या पक्षाच्या बाजूने काम करतील, परंतु काँग्रेसच्या चुकीच्या धोरणांमुळे त्यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. तसेच, त्यांनी आरोप केला की काँग्रेस जिल्हाध्यक्ष आणि खासदार यांच्याशी संबंधित काही शहरातील लोक आहेत, ज्यांना शहरातील समस्या आणि समाजाच्या कार्यांशी काहीही देणे-घेणे नाही.

या लोकांकडून पूर्व अध्यक्षांच्या कानात द्वेष पसरवले जातात, ज्यामुळे योग्य काम होत नाही. त्यामुळे दोन्ही नेत्यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे आणि त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्त्यांनीही आपल्या पदांचा राजीनामा दिला . आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवारावर याचा थेट परिणाम होईल अशी चर्चा अचलपूर आणि परतवाडा शहरात सुरू आहे.

> आम्हाला या दोघांच्या राजीनाम्याबाबत काही माहिती नाही किंवा त्यांचा राजीनामा अद्याप मिळालेला नाही माहिती घेतो आणि नंतर सांगतो- श्रीकांत झोडपे, ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष , अचलपूर



# राखेची वाहतूक करणाऱ्या दोन ट्रकचालकांना मारहाण

## वाहनांसह चालकांना जाळून टाकण्याचीदिली धमकीसावर्डी येथील घटना, चार आरोपी विरोधात गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नांदगाव पेठ** -ओव्हरलोड वाहतूक आणि वाहनांतून उडणाऱ्या राखेचा मुद्दा माध्यमांनी उचलल्यानंतर प्रादेशिक परिवहन विभागाने वाहनांवर कार्यवाहीचा धडाका सुरू केला.यामध्ये तीन दिवसात पंधरा वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली मात्र नियमानुसार वाहतूक करणाऱ्या काही वाहनांना अडवून चालकांना मारहाण करण्याच्या काही घटना उघडकीस आल्या. यामध्ये नांदगाव पेठ व माहुली जहागीर पोलिसात अज्ञात आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की,१५ ऑक्टोबर रोजी रात्री दहा वाजताच्या दरम्यान रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पामधून वाहन क्र.यूपी ६४,बीटी ८५६३ व यूपी ६४,बीटी ८७९३चे चालक राखेची वाहतूक करतांना सावर्डी येथील टी पॉईंट जवळ एका बोलेरो वाहनाने हे दोन्ही ट्रक थांबविले. बोलेरो वाहनांतून अज्ञात चार आरोपींनी दोन्ही ट्रकचालकांना ओव्हरलोड गाडी कशी काय चालवत आहे म्हणून वाहनाची आरसी मागितली.चालकाने आरसी मालकाकडे असल्याचे सांगताच भडकलेल्या आरोपींनी दोन्ही वाहनांच्या चालकांना बेदम मारहाण करत अश्लील शिवीगाळ केली तसेच यापुढे या मार्गावर वाहन दिसल्यास वाहनांसह दोन्ही चालकांना जाळून टाकण्याची धमकी दिली. भयभीत झालेले दोन्ही चालक तेथून निघून गेले. त्यानंतर त्यांनी नांदगाव पेटज पोलिस स्टेशनला रीतसर तक्रार दाखल करत पोलिसांना आपबिती सांगितली. पोलिसांनी फिर्यादी चालक कृष्णकुमार नन्हकुमार कनोजिया,वय २९,हातीम अन्सारी रा.माहुली जहागीर यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध बीएनएस १२६(२) ,२९६,११५(२), ३५१(२)कलमान्वये गुन्हा दाखल त्या अज्ञात चार आरोपींचा शोध घेत आहे.गुन्हा दाखल झाल्यानंतर चोवीस तासात आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आले नव्हते मात्र लवकरच आरोपी तुरुंगात असतील अशी ग्वाही पोलिसांनी दिली.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आत्मसात करून समाज व राष्ट्राच्या प्रगतीचे वाहक व्हा- डॉ. पुरुषोत्तम पाळेकर

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्याची समाजाला खरी गरज वर्क्तुत्व स्पर्धेतील स्पर्धकांचा सुर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८ गुरुकुंज मोझरी**
आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची समजाला खऱ्या अर्थाने गरज आहे.इंटरनेट मोबाईलच्या युगात सर्वांचेच वाचन कमी झाले आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या विपूल साहित्य संपदेत विद्यार्थ्यांना जिवनात यशस्वी होण्याचा राजमार्ग दाखविला आहे. वर्क्तुत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांची वैचारीक बैठक पक्की होण्यास मौलिक मदत होते.महाविद्यालयीन युवकांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांपासुन प्रेरणा घेवुन व विचार आत्मसात करुन समाज व राष्ट्राच्या प्रगतीचे वाहक व्हावे असे प्रतिपादन अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे आरोग्य विश्वस्त प्रमुख व महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलचे माजी अध्यक्ष डॉ.पुरुषोत्तम पाळेकर यांनी केले.

ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमित्त श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या अध्यक्षीय स्थानावरुन बोलत होते. ते पुढे बोलतांना म्हणाले की, सन् १९८९ मध्ये नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. दादासाहेब काळमेघ यांनी राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवात वक्त्तव स्पर्धेचा समावेश असावा अशी संकल्पना मांडली होती तेव्हापासुन म्हणजे ३५ वर्षापासून आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा अविरत सुरु असुन त्याचा मला मनस्वी आनंद आहे. असेही बोलतांना ते म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय आकोटचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे बोलतांना म्हणाले की वक्तृत्व स्पर्धेत हरणे व जिंकणे हा भाग महत्वाचा नसून नेतृत्व गुणांच्या विकासासाठी पुण्यतिथी महोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे व्यासपीठ लाभणे हीच मोठी बाब आहे.आजच्या काळात वक्ता मिळणे सोपे आहे. परंतु श्रोता मिळणे कठीण आहे.राष्ट्रसंताचे साहीत्य हे



अक्षर वाड्मय असुन त्यातुन युगधर्म म्हणजे काय हे सांगितले आहे.वास्तव परीस्थितीचे भान देणारे साहीत्य राष्ट्रसंतानी लिहीले असल्यामुळे त्यांच्या साहित्याचा अभ्यास युवकांनी केला पाहीजे .परंतु त्याकरीता आचरण महतवाचे आहे.आचरणाशिवाय विचारांचे महत्व लोकांना तुम्ही सांगू शकत नाही. यावेळी मंचावर श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुरलीधर खारोडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.लक्ष्मीकांत पायमल्ले, सहायक कार्यक्रम अधिकारी मंगेश कोल्हटकर,डॉ नंदकिशोर काळे, बक्षिस दाते रमेश बोबडे डॉ राजेश बोबडे, डॉ. मंगला देशमुख,डॉ चारुता पार्लेवारडॉ जनसेवक जायस्वाल यांची उपस्थिती होती. या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून स्पर्धक सहभागी झाले. इंदूताई अजाबराव देशमुख यांच्या स्मरणार्थ प्रथम पारितोषिक, श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाची विद्यार्थीनी प्रतिक्षा शिंदे, स्व. शांताबाई शामरावजी बोबडे यांच्या स्मणार्थ द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक,विवेक नारंगे यशवंत महाविद्यालय वर्धा, डॉ. अनिल गंधे यांच्या स्मरणार्थ तृतीय क्रमांकाचे पारितोषिक, अभय आळशी ,विग वझे महाविद्यालय मुलुंड मुंबई, स्व.रमेश लकडे यांच्या स्मरणार्थ चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक प्रथमेश धायगुडे केएसी महाविद्यालय खोपोली व आदित्य टोळे याला डॉ. अशोक कोठारी यांच्याकडून पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. सर्व सहभागी स्पर्धकांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक व डॉ जनसेवक जयस्वाल यांच्याकडुन ग्रामगीता प्रदान करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून अरविंद राठोड व सुषमा सोनारे यांनी काम पाहिले तर कार्यक्रमाचे संचालन सहानिका इंगोले व श्रध्दा वाभळे यांनी केले.

# हर्षवर्धन देशमुख म्हणतात मी निवडणूक लढवणार नाही

## पक्ष ज्याला तिकीट देईल, त्याचा प्रचार करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**
राज्याचे माजी कृषी मंत्री तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी विधानसभा निवडणूक लढण्यापासून स्वत:ला दूर ठेवण्याचे ठरविले असून पक्ष देईल त्या उमेदवाराचा प्रचार करण्याचे मान्य केले आहे. हर्षवर्धन देशमुख हे शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते असून यापूर्वी विधानसभेत त्यांनी मोर्शी-वरुड मतदारसंघाचे नेतृत्व केले आहे.

शरद पवार यांनी दिलेल्या निधीतून श्री शिवाजी शिक्षण संस्था एका यशस्वी शेतकरी महिलेला पुरस्कार देणार आहे. त्यानिमित्त माध्यमांशी बोलताना त्यांनी वरील राजकीय भाष्य केले.

ते म्हणाले, संस्थेचा व्याप मोठा असल्याने मी स्वत: निवडणूक लढणार नाही. परंतु पक्ष ज्या उमेदवाराला तिकीट देईल, त्याचा प्रचार करेन. श्री



शिवाजी शिक्षण संस्थेच्या गेल्या निवडणुकीत माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे आणि त्यांच्यात सामना रंगला होता. त्यामुळे या दोघांमध्ये राजकीय वैमनस्य असल्याचे सार्वमत बनले होते.

सध्या नरेशचंद्र ठाकरे यांचे चिरंजीव आणि वरुड पंचायत समितीचे माजी सभापती यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे उमेदवारी मागितली आहे. त्यामुळे हर्षवर्धन देशमुख काय भूमिका घेतील, याबद्दल सर्वांना उत्सुकता आहे. या पार्श्वभूमीवरच वरील प्रश्न त्यांना विचारण्यात आला होता. परंतु त्यांनी स्वत:च ही बाब खोडून काढीत पक्षाने कुणालाही तिकीट दिली, तरी मी त्या उमेदवाराचा प्रचार करेन, हे मान्य केले.

महाविकास आघाडीमध्ये या मतदारसंघावर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी दावा केला आहे, तर तिकडे महायुतीमधील अजीत पवार गटाचे देवेंद्र भुयार हे सध्या मोर्शी-वरुडचे आमदार आहेत.

# जिल्ह्यात ४५०३२ युवा मतदारांची नोंद

## सर्वाधिक ६८३८ मतदार अमरावती विधानसभा मतदार संघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मतदार नोंदणीला अधिक गती मिळाली आहे. जिल्ह्यात १८ ते १९ या वयोगटातील युवा मतदार प्रथमच आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहे. युवा मतदारांची नोंदणी झाली आहे. १८ ते १९ वर्षा दरम्यान जिल्ह्यात ४५ हजार ३२ युवा मतदार आहेत. अमरावती विधानसभा मतदार संघात ६ हजार ८३८ युवा मतदारांची नोंदणी झाली आहे. यंदा विधानसभेला प्रथमच हे युवा आपला मतदानाचा हक्क बजावणार आहे. यंदा राज्यात लोकसभा, विधानसभा या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांच्या अद्ययावती करणासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम,



घरोघरी सर्वेक्षणाची मोहीम राबवली होती. त्यानुसार प्रारूप मतदार यादी लोकसभे पूर्वी प्रसिद्ध करून विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबवला तत्पूर्वी कुटुंबाच्या जबाबदारी बरोबरच जिल्ह्याच्या राजकारणाची धुरा कोणाच्या हाती द्यायची हे ठरविण्याची जबाबदारीही १८ ते १९ या वयोगटातील मतदारांच्या हाती असल्याचे स्पष्ट झाले. जिल्ह्याच्या एकूण मतदार संख्येपैकी या वयोगटातील मतदारसंख्या सुमारे ४५० ३२ आहे. तर २० ते २९ या क्योगटातील मतदारांपुढे शिक्षण, नोकरीचे प्रश्न आहेत. तर ३० ते ३९ या वयोगटातील मतदारांपुढे घर, कुटुंब, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे आरोग्याचे प्रश्न आहेत.मात्र सध्यातरी हे प्रश्न सुटलेले नाहीत.

**विधानसभा मतदार संघनिहाय १८ ते १९ वर्षादरम्यान मतदार**

| | |
|---|---|
| धामणगाव रेल्वे | ६१८२ |
| बडनेरा | ५४६२ |
| अमरावती | ६८३८ |
| तिवसा | ४८३९ |
| दर्यापूर (एससी) | ५५१७ |
| मेळघाट (एसटी) | ५३०१ |
| अचलपूर | ५९३२ |
| मोर्शी | ४९६१ |
| एकूण | ४५०३२ |

# जिल्ह्यात ८९.९४ टक्के जलसाठा

## ५६ प्रकल्पात मागील वर्षीच्या तुलनेत १ टक्का वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती-** जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रात झालेल्या पावसाने मोठा प्रकल्प, मध्यम आणि लघु अशा ५६ प्रकल्पात जलसाठ्यात वाढ झाली. यातील बरेच प्रकल्प ओव्हरफ्लो होऊन वाहत असल्याने प्रशासनाने त्या प्रकल्पाचे दारे खुली करण्यात आली. यामध्ये एक मोठा अप्पर वर्धा प्रकल्प तर तीन मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे. आजघडीला ८९.९४ टक्के जलसाठा आहे. गतवर्षी या सर्व




प्रकल्पाचा ८८.३८ इतका जलसाठा होता. यंदा तो जवळजवळ एक टक्यांनी जास्त आहे. जिल्ह्यात यंदा झालेल्या सततधार पावसामुळे प्रकल्पातील पाणीसाठा वाढला आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याला तसेच शेतीला पूरक पाणी मिळेल. जिल्ह्यात ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत पावसाची रिपरिपसह दमदार हजेरी लावली होती. काही सप्टेंबर अखेर पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे जलपातळीत आणखी वाढआहे. सद्यास्थितीत ५६ प्रकल्पात उपयुक्त जलसाठा ८९. ९४ टक्के आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा १०० टक्क्यांवर पोहोचला आहे. ७ मध्यम प्रकल्पात ७९.३७ टक्के पाणीसाठा तर ४८ लघु प्रकल्पात ८५.८० टक्यांवर जलसाठा आहे. यातील अनेक मध्यम आणि लघु प्रकल्प ओव्हरफ्लो झालेले आहेत.

# श्री शिवाजी शिक्षण संस्था विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार' देणार

## दि.११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती** – शिक्षणमहर्षी कृषिरत्न डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी महिलांना कृषी क्षेत्रात दिलेले महत्त्व लक्षात घेऊन श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीने यावर्षीपासून विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेसाठी 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार' सुरु केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.खासदार श्री.शरदचंद्र पवार यांच्या प्रेरणेने व त्यांनी दिलेल्या दाननिधीच्या व्याजातून हा पुरस्कार यापुढे दरवर्षी देण्यात येणार असल्याची माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व ज्येष्ठ उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.पुरस्काराचे स्वरूप रोख रु.१,११,१११/- (रुपये एक लक्ष अकरा हजार एकशे अकरा), स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, केंद्र सरकारने डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती प्रीत्यर्थ प्रसारित केलेले १२५ रुपयांचे नाणे, साडी चोळी, शाल व श्रीफळ असे असणार आहे.भाऊसाहेबांच्या जयंती उत्सवाच्या मुख्य सोहळ्यात हा पुरस्कार सन्मानपूर्वक दिला जाईल, असेही ते म्हणाले.विदर्भातील प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकरी महिला या पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्यास पात्र आहेत. पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविणा ऱ्या महिलेच्या नावाने शेती असावी किंवा तिच्या पतीच्या नावाने शेती असेल तर सह भोगवटदार म्हणून महिलेचे नाव सात बारावर असणे आवश्यक आहे. यशस्वी उत्पादन, रोपवाटिका, बिजोत्पादन, सेंद्रिय निविष्ठा उत्पादन व वापर, व्यवस्थापन, साठवणूक, प्रतवारी, पॅक हाउस, मूल्यवर्धन, प्रक्रिया, विपणन, निर्यात इत्यादी कार्यात प्रत्यक्ष सहभागी होऊन या कार्यात अधिकाधिक नफा कमावणारी शेतकरी महिला या पुरस्कारासाठी पात्र आहे. यांत्रिकीकरण, ठिबक सिंचन, गोबर गॅस, दुग्ध व्यवसाय, सेंद्रिय शेती, गांडूळ खत युनिट, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती करणारी तसेच परिसरातील शेतकरी व शेतकरी महिलांना मार्गदर्शन करणारी व त्यांना प्रोत्साहन देऊन विविध उपक्रमात सहभागी करून घेणारी शेतकरी महिला असावी.पिक स्पर्धा, कृषी प्रदर्शन, कृषी मेळावे यात सहभाग घेणारी, कृषी संस्थांना भेटी देणारी तसेच कृषी विषयक प्रचार व प्रसार करून शेतकरी व महिला शेतकऱ्यांना उन्नत शेतीसंबंधी मार्गदर्शन करणारी महिला देखील या पुरस्कारासाठी पात्र आहे.प्रस्ताव पाठविताना सोबत वर उल्लेख केलेल्या विविध कार्याची प्रमाणपत्रे, पुरस्काराची प्रमाणपत्रे, शेतीचा सात बारा व ८ अ व प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक त्यांनी सांगितले.या पुरस्कारासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावतीचे ज्येष्ठ उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर यांच्या अध्यक्षतेत पुरस्कार निवड समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या मार्गदर्शनात कृषी महाविद्यालय,अमरावती हे पुरस्काराचे संपूर्ण कामकाज पाहणार आहे.सर्व प्रस्तावांची छाणनी केल्यानंतर सर्वात योग्य प्रस्तावासाठी पुरस्कार समिती व आवश्यक वाटल्यास संस्थेचे पदाधिकारी प्रत्यक्ष भेट देऊन नंतर पुरस्काराचा निर्णय घेण्यात येईल, असे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले.प्रस्तावाचा विहित नमुन्यातील अर्ज प्राचार्य, कृषी महाविद्यालय, मोर्शी रोड, अमरावती यांच्या कार्यालयात तसेच महाविद्यालयाची वेबसाईट ꣸.ीरलविर्ज्ञी.ीस वर उपलब्ध आहे.प्रस्ताव पाठविण्याची शेवटची तारीख ११ नोव्हेंबर २०२४ असून या तारखेच्या आत प्राचार्य, कृषी महाविद्यालय, मोर्शी रोड, अमरावती यांच्याकडे प्रस्ताव पोहोचतील याची दक्षता घेण्यात यावी, असेही ते म्हणाले.यावर्षी कृषिरत्न डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा शतकोत्तर रौप्य महोत्सव यावर्षी शासनस्तरावर साजरा करण्यात येत असून संस्थेच्या वतीने मागच्या वर्षीपासून विविध कार्यक्रम व उपक्रमांच्या माध्यमाने आम्ही तो साजरा करीत आहोत. मागच्या वर्षी आयोजित भव्य राष्ट्रीय कृषी प्रदर्शनीला महिला शेतकऱ्यांच्या मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे महिला शेतकऱ्याला सन्मानित करण्याचा निर्णय संस्थेने घेतला आणि मा.शरदचंद्र पवार साहेबांनी या प्रदर्शनीला भेट देऊन या निर्णयाला प्रोत्साहन दिले व दाननिधी दिला, त्याबद्धल संस्था त्यांची आभारी आहे. विदर्भातील महिला शेतकऱ्यांसाठीचा हा पहिलाच मोठा पुरस्कार असल्याने विदर्भातील शेतकरी महिलांनी मोठ्या संख्येने प्रस्ताव पाठवावे, असे आवाहन हर्षवर्धन देशमुख आणि ॲड. गजाननराव पुंडकर यांनी केले.पत्रकार परिषदेला संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी व समिती सदस्य प्रा.सुभाष बनसोड, सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, पुरस्कार समिती सदस्य सचिव प्राचार्य डॉ.समीर लांडे, समिती सदस्य प्राचार्य डॉ.नंदकिशोर चिखले, प्राचार्य डॉ.सी.एम.देशमुख, प्राचार्य अभय ढोबळे, प्राचार्य डॉ.राजेश खाडे, प्रसिद्धी प्रमुख डॉ.कुमार बोबडे उपस्थित होते.

# 'या खुर्चीने दगा दिला ऐसा की...'; शिंदेंच्या सेनेने ठाकरेंना व्यंगचित्रातून डिवचलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ मुंबई** – 'जयंत पाटलांमध्ये महाराष्ट्र सांभाळण्याचा आणि महाराष्ट्राला पुढे नेण्याची दृष्टी, शक्ती आहे', असे विधान शरद पवारांनी इस्लापुरात बोलताना केले. इतकंच नाही, तर 'मी पक्षाचा प्रमुख म्हणून सांगतो की, उद्याचा महाराष्ट्र सावरण्यासाठी आणि उद्याचा प्रगत महाराष्ट्र घडवण्यासाठी मोलाची कामगिरी याच परिसरातून होणार आहे, असेही पवार म्हणाले.

शरद पवारांच्या विधानाने महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जयंत पाटीलही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असतील, ही चर्चा सुरू झाली. त्यावर शरद पवारांनी भूमिका स्पष्ट केली. पण, विरोधकांच्या हाती आयता मुद्दा मिळाल्याचे दिसत आहे. शरद पवारांच्या विधानानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने उद्धव ठाकरेंना टार्गेट केले आहे. शिंदेंच्या शिवसेनेने एक व्यंगचित्र पोस्ट केले आहे. त्यात मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवारांची खुर्ची पवारांनी जयंत पाटलांकडे सरकावल्याचे दिसत आहे. त्यामुळे ठाकरे खाली आपटले.

हे व्यंगचित्र पोस्ट करताना शिवसेनेने म्हटले आहे की, या खुर्चीने दगा दिला ऐसा की, पद गेले, पतही गेली. पदाविना सत्ता गेली, सत्तेविना मलिदा गेला, असे म्हणत शिंदेंच्या शिवसेनेने ठाकरेंना मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवारीवरून डिवचले आहे.




# शरद पवार कसले परिवर्तन करणार? ते तर आम्ही करू

## परिवर्तन महाशक्तीचे १५० जागांवर एकमत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८पुणे:-** शरद पवार कसे परिवर्तन करणार? तो तर आमचा अधिकार आहे व आम्हीच ते करू अशा शब्दांमध्ये शेतकरी नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली. परिवर्तन महाशक्ती चे विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातील १५० जागांवर एकमत झाले असल्याचे दावा यावेळी शेट्टी, प्रहार अपंग संघटनेचे बच्चू कडू व स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे यांनी केला. स्वराज्य पक्षाच्या कार्यालयात गुरूवारी दुपारी परिवर्तन महाशक्ती या नावाने शेट्टी, कडू, संभाजी राजे तसेच शंकरअण्णा धोंडगे, वामनराव चटप व अन्य संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत या नेत्यांनी पत्रकारांबरोबर संवाद साधला. परिवर्तन महाशक्तीमध्ये समविचारी अशा तब्बल ३० ते ४० संघटना सहभागी झाल्या आहेत. आमचे सर्वांचे विधानसभेच्या १५० जागांवर एकमत झाले आहे. काही जागा दोनदोन पक्ष किंवा संघटनांना हव्या आहेत. तुमच्यामध्ये चर्चा करून तुम्हीच त्यावर निर्णय घ्या असे त्यांनी सांगितले आहे. लवकरच आम्ही आमची यादी जाहीर करू असे या नेत्यांनी सांगितले.राज्यात मोजकीच काही घराणी गेली अनेक वर्षे राज्यकर्ते आहेत. त्यांनी कष्टकरी वर्गाला कायमच उपेक्षित, वंचित ठेवले. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरीही गरीब कष्टकरी वर्गाच्या घरातील अंधार काही मिटलेला नाही. या सगळ्याला उत्तर देण्यासाठी, गरीबांनी न्याय मिळवून देण्यासाठी म्हणून आम्ही एकत्र आलो आहोत. प्रस्थापितांना बाजूला करणे व जनतेच्या हातात राज्य देणे हा आमचा उद्देश आहे. त्याला जनतेची चांगली साथ मिळते आहे. आमचे उमेदवार आम्ही जाहीर करूच, त्यांच्याकडून आमच्याकडे कोणी येणार असेल तर त्यांची पात्रता, उमेदवारीचे आमचे निकष पाहून आम्ही त्यांचेही स्वागत करू, ही लढाई जनतेच्या साथीनेच आम्ही जिंकणार आहोत असे शेटी, कडू व छत्रपती संभाजी राजे यांनी सांगितले.

# निवडणूक आचारसंहितेतही मिळणार आनंदाचा शिधा

## ३ लाख १७ हजार ७४३ लाभार्थ्यांच्या घरी पोहोचला शिधा

### राजकीय फोटो नसलेल्या किटचे होणार वाटप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती :** विधानसभेची आचार संहीतालागू झाल्याने रेशन दुकानातुन आनंदाचा शिधा मिळणार का असा संभ्रम नागरीकांमध्ये होता. मात्र आंनदाच्या शिधाची पिशवी वगळून शिधामधील संपुर्ण रेशन कार्ड धारकांना मिळणार असल्याचे पुरवठा विभागाने सांगितले आहे. दोन महीन्यात ५ लाख २७ हजार ३४२ लाभार्थ्यांपैकी ३ लाख १७ हजार ७४३ लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला आहे. तर उवर्रीत २ लाख ९ हजार ५९९ लाभार्थ्यांना किट वाटपाची प्रक्रिया सुरू आहे.सणासुदीत रेशनकार्ड धारकांना शासनाकडून केवळ शंभर रूपवात आनंदाचा शिधा दिला जाते. यामध्ये १ किलो साखर, १ किलो तेल, १ किलो, रवा व १ किलो हरभरादाळीचा समावेश आहे. गणेश चतुर्थी निमित्य नागरीकांना या आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय शासनाने घेतला. परंतु प्रत्यक्षात गणेश उत्सव झाल्यानंतर आनंदाचा शिधा प्राप्त झाला आहे. त्यामुळे या उत्सवाचा शिधा वाटप सुरू असतानाच मंगळवारी विधानसभेची आचारसंहीता लागु झाली.पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे फोटो असलेल्या पिशवीमध्ये आनंदाचा शिधा वाटप केल्या जातो. त्यामुळे विधानससभेच्या निवडणुकीची आचारसंहीता सुरू असल्याने हा शिधा वाटप होईल का असा संभ्रम नागरीकांमध्ये निर्माण झाला होता. परंतु यावर पर्याय काढत त्या राजकीय पिशवीविनाच कार्डधारकांना शिधामधील साहीत्य देण्यास काही हरकत नसल्याचे स्पष्टीकरण पुरवठा विभागाकडुन देण्यात आले आहे. तसे वाटप देखील सद्या सुरू आहे. जिल्ह्यात ५ लाख २७ हजार ३४२ आनंदाचा शिधाचे लाभार्थी असुन सप्टेंबर, ऑक्टोबर या दोन महीन्यात ३ लाख १७ हजार ७४३ शिधाचे वाटप करण्यात आले आहे. प्रतिक्षेत असलेल्या २ लाख ९ हजार ५९९ लाभार्थ्यांना या किटचे वाटप त्या राजकीय पिशवीविना सुरू आहे.


### दिवाळीचा शिधा मात्र अप्राप्त

सद्या सुरू असलेला आनंदाचा शिधा वाटप हे गणेशउत्सवाकरीता आलेले आहे. जिल्ह्याला ते दशीरा प्राप्त झाल्याने अद्यापही अर्ध्या रेशनकार्ड धारकांना या शिधाचे वाटप झाले नाही. परंतु १५ दिवसांवर दिवाळी सण असुन याचे धान्य आणि शिधा अद्यापही अप्राप्त आहे. त्यामुळे दिवाळीची शिधा केव्हा मिळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# वायू प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेचे मोठे पाऊल

## हॉटेल, ढाबा, बेकरीसाठी गॅसचा वापर सक्तीचा


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ मुंबई–** वायू प्रदूषण कमी करण्यासाठी शहरातील हॉटेल, ढाबा आणि बेकरी या ठिकाणी लाकूड व कोळसा जाळण्यास महापालिकेने बंदी घातली आहे. त्याऐवजी एलपीजी गॅस, इलेक्ट्रिक ओव्हन, बायोगॅस, किंवा हरित (ग्रीन) गॅस वापरण्याची सक्ती करण्यात आली आहे. त्याचा वापर न केल्यास पहिल्यांदा पाच हजार, दुसऱ्यांदा दहा हजार रुपये दंड केला जाणार आहे. त्यानंतर हॉटेल, ढाबा व बेकरी लाखबंद (सील) केली जाणार आहे.



हॉटेल, ढाबा व बेकरी येथील भट्टीसाठी तसेच, रस्त्याकडेच्या खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांना लाकूड व कोळसा न वापरता एलपीजी गॅस, इलेक्ट्रिक ओव्हन, बायोगॅस, किंवा ग्रीन गॅसचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व आस्थापनांना भट्टीसाठी ११ मीटर उंचीची आणि ओव्हनसाठी १९ मीटर उंचीची चिमणी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, धूळ संग्राहक करणारे यंत्र (डस्ट कलेक्टर मशिन) लावावे. या नियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर गॅस आणि इलेक्ट्रिक ओव्हन या नैसर्गिक इंधनाचा वापर न केल्यास पहिल्या वेळेस पाच हजार रुपये दंड केला जाणार आहे. दुसऱ्यावेळी दहा हजार रुपये दंड आकारला जाणार आहे. तिसऱ्यावेळी आस्थापना लाखबंद केली जाणार आहे. ही कारवाई आरोग्य विभागाकडून केली जाणार आहे. या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाच्या नवीन धोरणास आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.

# आचारसंहितेमुळे अनधिकृत होर्डिंग, बॅनर, अतिक्रमणांवर कारवाई

## मनपा उपायुक्तांची विविध ठिकाणी पाहणी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**
आचारसंहितेमुळे महापालिका ॲक्शन मोडवर आली असून, शहरातील राजकीय पक्षांच्या जाहिराती, नेत्यांच्या जाहिरातींचे अनधिकृत होर्डिंग, फलक काढण्याची कारवाई करण्यात आली. विधानसभा निवडणुकीच्या घोषणेसोबत मनपा विविध ठिकाणी सरकारी योजना आणि राजकीय पक्षांच्या जाहिराती काढण्यास सुरुवात केली आहे. मनपाने पाचही झोनसाठी पथके तयार केली आहेत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरातील विविध ठिकाणच्या जाहिराती काढण्याचे काम सुरू केले. शहरातील विविध परिसरात सतत फेऱ्या मारून जाहिराती काढून टाकण्याचे निर्देश उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी दिले आहेत.

उपायुक्त वासनकर यांनी दैनंदिन साफ सफाई, अनधिकृत होर्डिंग व बॅनर, अतिक्रमण काढण्याच्या अनुषंगाने इतवारा बाजार, जिल्हाधिकारी कार्यालय, गाडगेनगर, पंचवटी, शेगाव नाका, विलास नगर, नागपुरी गेट, लालखडी, इर्विन चौक परिसराची पाहणी केली. या पाहणी दरम्यान सहायक आयुक्त भूषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, सुभाष जानोरे, बाजार परवाना अधीक्षक उदय चव्हाण, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, पोलिस व मनपा कर्मचारी उपस्थित होते. या पाहणी दरम्यान दैनंदिन वर्गीकृत कचरा संकलन करणे, दैनंदिन व्यावसायिक, खासगी क्षेत्रात रात्री साफ सफाई, नेहमी कचरा दिसणाऱ्या ठिकाणाचे सौंदर्यीकरण, शेणखत उचलणे, नाल्यांची नियमित साफ सफाई करणे, प्लास्टिक बंदी मोहीम राबवणे तसेच दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश उपायुक्तांद्वारे देण्यात आले. रस्त्यावर झाडांच्या फांद्या आढळून आल्यास उद्यान विभाग व स्वच्छता विभाग यांनी समन्वय साधून कारवाई करावी. घंटागाडी नियमितपणे घरोघरी पाठवण्याची व्यवस्था करावी. हॉकर्सला डस्टबिन ठेवणे अनिवार्य करावे. डस्टबिन न ठेवल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश उपायुक्तांनी दिले.

कामात हयगय झाल्यास प्रशासकीय कारवाई मनपा कर्मचाऱ्यांनी कामात कोणत्याही प्रकारची हयगय केल्यास प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. प्रभागातील स्वच्छतेच्या कोणत्याही तक्रारी येता कामा नयेत. धुवारणी व फवारणी नियमितपणे करण्याचे निर्देश उपायुक्तांनी दिले. अतिक्रमण धारकांवर संयुक्त कारवाई केली असून, फुटपाथ व नालीवरील अतिक्रमण काढण्यात आले. सदर दुकानदाराने फुटपाथवर ठेवलेले साहित्य जप्त केले. रस्त्यावरील अतिक्रमण धारकांनी स्वत: अतिक्रमण काढण्याच्या सूचना मनपातर्फे सातत्याने देण्यात येत आहेत. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून कारवाईची तमा न बाळगता अतिक्रमण केले जात असल्याने कारवाई करण्यात आली.

# डेटिंग ॲपद्वारे फसवणुकीचे जाळे

## पुण्यासह नागपूर आणि दिल्लीतही हनी ट्रॅपद्वारे लुटण्याचे प्रकार उघडकीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८पुणे :** नवीन मित्र मैत्रिणी किंवा जोडीदार शोधण्यासाठी डेटिंग पचा वापर करत असाल तर सावधान! कारण तुमची फसवणूक होऊ शकते. सध्या समलैंगिक, उभयलिंगी, तृतीयपंथी यांसाठीच्या 'ग्रींडर' पच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर फसवणुकीच्या घटना समोर आल्या आहेत. 'ग्रींडर' प हा एकप्रकारे हनी ट्रॅपचाच प्रकार असून, याद्वारे पुण्यासह नागपूर आणि दिल्लीमधील अनेकांना गंडा घालण्यात आल्याचे तक्रारी आल्याने सायबर क्राईमच्या रडावर हे प आले आहे.

मोबाईल ही तरुणपिढीसाठी चोवीस तासांची गरज बनली आहे. 'ग्रींडर' हे एलजीबीटीक्यू समुदायाचे एक मोफत डेटिंग प आहे.'ग्रींडर' या पद्वावरे तरुण–तरुणीशी ओळख निर्माण केली जाते. सुरुवातीला त्यांच्याशी छान संवाद साधत एक मैत्रीपूर्ण नाते तयार केले जाते. त्यानंतर काही दिवसात त्या व्यक्तीला एका अज्ञातस्थळी डेटवर बोलावले जाते.ती व्यक्ती तिथे आल्यावर तिचे अपहरण करून त्यांच्याकडून पैसे उकळले जातात किंवा शरीरसंबधांच्या बहाण्याने या व्यक्तींचे छुपे व्हिडिओ काढले जातात. त्यानंतर याच व्हिडिओच्या आधारे त्यांना धमकावून किंवा मारहाण करून लुटले जाते.



> ग्रींडर डेटिंग प अगर इतर कोणत्याही पद्वारे संपर्कात येऊन कोणत्याही नागरिकांना लुटण्यात आले असल्यास अगर ब्लँकमेल केले जात असल्यास त्यांनी जवळच्या पोलिस स्टेशनशी संपर्क साधावा
>
> **– पंकज देशमुख, पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण**

ग्रींडर डेटिंग पद्वारे ओळख वाढवून तरुणाला भेटण्यासाठी बोलावून त्याचे अपहरण करून लुटणाऱ्यांचा पुणे ग्रामीण पोलिसांनी नुकताच पर्दाफाश केला आहे. यापूर्वीही नागपूरमध्ये या पवरून संपर्क साधत एका तरुणावर घातक हल्ला करत त्याला लुटण्याचा प्रयत्न झाला होता.या हल्ल्यात २१ वर्षीय तरुण थोडक्यात बचावला होता. दिल्लीतही १५० पेक्षा जास्त वरिष्ठ अधिकाऱ्यांना धमकावल्याचा आणि त्यांच्याकडून पैसे उकळण्याचा प्रकार उघडकीस आल्याची माहिती सायबर क्राईमच्या सूत्रांनी दिली.

### धोक्याची घंटा

मित्र–मैत्रिणी आणि जोडीदार शोधण्यासाठी विविध चॅटिंग आणि डेटिंग पचा वापर करण्याकडे तरुणाईचा कल वाढला आहे. मात्र, हीच तरुणाईसाठी धोक्याची घंटा ठरू लागली आहे. सायबर चोरट्यांनी या डेटिंग पला लक्ष्य केले आहे.

# बडनेरातील 'त्या' तरुणीची पतीनेच केली हत्या; आरोपी पतीसह एकास अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८बडनेरा :** बडनेरा रेल्वेस्थानक परिसरात मृतावस्थेत आढळून आलेल्या तरुणीची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याची बाब शवविच्छेदन अहवालावरून समोर आली आहे. त्यानुसार बडनेरा पोलिसांनी तपासाला एक वेग देत गुरुवार, १७ ऑक्टोबर रोजी या प्रकरणात महिलेच्या पतीला अटक मध्यप्रदेश मधील मंडला जिल्ह्यातून अटक केली आहे तर आणखी एका सहआरोपीला अटक केली आहे दरम्यान मृत तरुणीची ओळख पटली आहे.



लक्ष्मण मडावी आणि शेखर उर्फ चंद्रशेखर नारायण चिंचोळकर (३४) रा. इंदिरानगर झोपडपट्टी, बडनेरा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. बडनेरा रेल्वे स्थानकावरील जुन्या वस्तीच्या बाजूने तिकीट घराशेजारी पाण्याच्या टाकीजवळ मंगळवार, १५ ऑक्टोबर रोजी सकाळी एका तरुणीचा मृतदेह आढळून आला होता. मध्यप्रदेशमधील ओहनी जिल्हा मंडला या ठिकाणचे आदिवासी कुटुंब कामाच्या शोधात बडनेरा येथे दाखल झाले यावेळी शेखर चिंचोळकर यांना ते भेटले असता शेखर याने त्यांना काम मिळवून देण्याचे आश्वासन दिले व आपल्या घरी घेऊन गेला मात्र काही वेळातच आदिवासी कुटुंब घराबाहेर पडत आम्हाला गावी परत जायचे असल्याचे म्हणाले यावेळी शेखर याने मी तुम्हाला रेल्वे स्टेशन पर्यंत पोहचवायला येतो असल्याचे म्हणाला तिघे रेल्वे स्टेशनवर आले असता शेखर ने भगवती मडावी हिच्या कडून ५०० रु घेत दारू आणण्यासाठी गेला त्यानंतर या पती पत्नीने गोंदिया जाण्यासाठी तिकीट काढले एवढ्यात शेखर दारू घेऊन त्या ठिकाणी आला व तिघे जण जवळ असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ दारू पिण्यासाठी गेले तिघांनी मिळून त्या ठिकाणी दारू पिल्यानंतर लक्ष्मण मडावी हा दारूच्या नशेत झोपी गेला मात्र रात्री १०.३० च्या दरम्यान लक्ष्मण शुद्धीवर आला असता शेखर हा भगवती सोबत आक्षेपार्य स्थितीत आढळला लक्ष्मण मडावी याने शेखर ला शिवीगाळ केली असता शेखर त्या ठिकाणावरून पळून गेला मात्र लक्ष्मण ने रंगाच्या भरात भगवती च्या डोक्यावर वित्त मारली व तिचे डोके जमिनीवर आपटले व परत झोपला सकाळी झोपेतून लक्ष्मण जागी झाला तेंव्हा त्याने भगवती ला हलवून बघितले असता ती मृत अवस्थेत दिसली तेंव्हा लक्ष्मण ने भगवती च्या अंगावर ब्लँकेट टाकून गावी निघून गेला. घटनेचा तपास गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात सहा. पोलीस निरीक्षक महेश इंगोले व अंमलदार यांनी घटनेपासून सतत दिवस रात्र घटनासंबधी माहीती एकत्रीत करून घटनेच्या परिसरातील चारही बाजूचे क्षणाक्षणाचे सर्व सिसिटीव्हीची पडताळणी करून घटनेची सत्यता शोधली. व त्यामधील संशयीत प्रथम आरोपी नामे शेखर उर्फ चंद्रशेखर नारायण चिंचोळकर व नंतर भगवती च्या पतीस मध्यप्रदेश येथून अटक केली. सदर चा गुन्हा अत्यंत गुंतागुंतीचा व क्लिष्ट असल्याने गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले व पथकातील कर्मचारी यांनी दिवस रात्र सतत प्रयत्न करून सदर चा गुन्हा उघडकिस आणला. सदर ची कारवाई . पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त श्रीमती कल्पना बारावकर मॅडम, पोलीस उपायुक्त सागर पाटील साहेब, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे , सहायक पोलीस आयुक्त गुन्हेशाखा, . शिवाजी बचाटे साहेब, पोनि. बाबाराव अवचार साहेब, गुन्हे शाखा अमरावती शहर, यांचे नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोउपनि संजय वानखडे, पोलीस अंमलदार – पोहवा दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमुख, पो.ना. संग्राम भोजने, मिर्झा नईम बेग, मंगेश शिंदे, पोकॉ राजीक रायलीवाले, योगेश पवार, निलेश वंजारी, सागर ठाकरे, चेतन कराडे, पोहवा संदीप खंडारे, पोकॉ चेतन शर्मा, राहूल दूधे, पो.ना. शशीकांत शेळके (पो.स्टे. बडनेरा), निखील बोंडे (बडनेरा आरपीएफ–सिटी) यांनी केली आहे.

# काँग्रेसची पहिली यादी जाहीर? पक्षाने दिलं स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका लागल्या असून महायुती आणि महाविकास आघाडीकडून अद्याप जागावाटप पूर्ण झालेलं नाही. त्यामुळे उमेदवारांची यादीही समोर आलेली नाही. जागा वाटप आणि उमेदवारांबाबत गेल्या काही दिवसांपासून अनेक चर्चा सुरू आहेत. त्यातच, काँग्रेसची पहिली यादीही व्हायरल होत आहे. याबाबत काँग्रेसने आता स्पष्टीकरण दिलंय.



भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने अजून महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी उमेदवारांची कोणतीही यादी अधिकृतरीत्या जाहीर केलेली नाही. त्यामुळे कुठल्याही अफवांवर विश्वास ठेऊ नका. लवकरच योग्य त्या माध्यमांद्वारे आम्ही ती यादी जाहीर करू, असं महाराष्ट्र काँग्रेसने त्यांच्या एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे.महाविकास आघाडीची १७ ऑक्टोबर रोजी मुंबईत बैठक झाली. या बैठकीत महाविकास आघाडीचे जागावाटप अंतिम टप्प्यात आले असून, २८८ पैकी २५०पेक्षा अधिक जागांचा तिढा सुटला आहे. अद्यापही २५ ते ३० जागांवर पक्षांनी सहमती होऊ शकलेली नाही. जागावाटपात काँग्रेस आणि शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) पक्षाच्या वाट्याला प्रत्येकी १००च्या आसपास, तर राष्ट्रवादीच्या वाट्याला ७५ ते ८० जागा येतील, असे सांगण्यात आले.

### काँग्रेसची पहिली यादी २० ऑक्टोबरपर्यंत येणार

महाविकास आघाडीचे जागावाटप उद्या शुक्रवारपर्यंत जाहीर होण्याची शक्यता विजय वडेट्टीवार यांनी वर्तविली. काँग्रेसची विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांची पहिली यादी २० ऑक्टोबरला येण्याची अपेक्षा आहे. काँग्रेसच्या वाट्याला आतापर्यंत ८४ जागा आल्या आहेत. २० तारखेला पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार आहे. त्याचदिवशी उमेदवारांची यादी जाहीर केली जाऊ शकते, असे वडेट्टीवार म्हणाले.

# मतदारसंघनिहाय अधिसूचना मंगळवारी

## अर्ज, नमुने तयार करण्यास सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवारपासून जिल्ह्यात प्रशासकीय कामकाजाला गती आली. २२ ऑक्टोबर रोजी मतदारसंघनिहाय अधिसूचना जाहीर होणार आहे. त्याच दिवसापासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होईल. जिल्ह्यातील आठ मतदारसंघांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून मतदारसंघनिहाय उमेदवारी अर्ज आणि त्याबाबतच्या प्रक्रियांसाठी आवश्यक अधिकारी, कर्मचारी नियुक्त्या केल्या आहेत. निवडणूक कामकाजासाठी आवश्यक अर्ज, नमुने आदी तयार करण्याच्या कामाला गती आली आहे. उमेदवारी अर्ज भरण्यास २२ पासून प्रारंभ होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी २९ ऑक्टोबर ही शेवटची मुदत आहे दोन दिवस शासकीय सुटी असल्याने निवडणुकीची अधिसूचना तयार करणे, उमेदवारी अर्जाचा नमुना तयार करणे, उमेदवारी अर्जासमवेतद्यावा लागणाऱ्या विविध अर्ज, नमुने तयार करणे, आवश्यक स्टेशनरी, साहित्य मागवणे, त्यानुसार अधिकारी, कर्मचाऱ्यांचे नियोजन करून तसे आदेश काढणे आदी विविध प्रकारच्या कामांना प्रशासनात गती आली. उमेदवारी अर्ज भरण्याबरोबरच प्रचार वाहने, भित्तिपत्रके, पोस्टर, सभा, बैठका आदींच्या परवानगी मागणीचे अर्ज, ध्वनिक्षेपकाचा वापर, त्याची मागणी करणारे अर्ज, दैनंदिन खर्च सादरीकरण नमुने, शपथपत्रे आदी विविध कामे आजपासून सुरू झाली. यासह निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालन तयार करणे, दाखल झालेल्या कागदपत्रांची नोंद ठेवण्यासाठी विविध रजिस्टर्स तयार करणे, सुरक्षा यंत्रणा आदींचीही तयारी आतापासूनच सुरु केली. या कामकाजासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे कामही सुरू झाले. कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश, मतदारसंघनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय अशा निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक कामकाज सुरू झाले आहे.

# तापमानातील वाढीचा कपाशीवर दुष्परिणाम

## पिकाची करपण्याकडे वाटचाल, शेतकऱ्यांमध्ये चिंता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८धामणगाव रेल्वे :** धामणगाव रेल्वे तालुक्यातील कावली वसाड परिसरामध्ये व इतरत्र मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ झाल्यामुळे कपाशीचे पीक करपल्याने पिकाचे नुकसान होणार आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकरी चिंतेत सापडला असल्याचे विदारक चित्र सर्वत्र दिसून येत आहे.



सध्या सर्वत्र सोयाबीन काढणीचा हंगाम सुरू आहे. अशा स्थितीत दरवर्षी दसरा झाल्यानंतर काही प्रमाणात तापमानामध्ये थंडावा निर्माण होतो. परंतु, यावर्षी अजूनपर्यंत तापमानात थंडावा निर्माण न झाल्यामुळे व तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे कपाशीची झाडे सुकल्यासारखी झाली आहेत. यामुळे उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट येणार, या चिंतेत आता शेतकरी पडला आहे.परिसरात यावर्षी सोयाबीन व कपाशी या दोन्ही पिकांना या परिसरातील शेतकऱ्यांनी सारखीच पसंती दिल्यामुळे दोन्ही पिकांची समप्रमाणात पेरणी केली गेली. सोयाबीन पिकामध्ये काही प्रमाणात शेतकऱ्यांना थोडा फायदा झाला असला तरी कपाशी या पिकावर शेतकऱ्यांची भिस्त होती. परंतु गेल्या काही दिवसांपासून तापमानामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याच्या परिणामी वातावरणात शुष्कता आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामधील कपाशीची झाडे सुकल्यासारखी झाली व बोंडाची गळसुद्धा मोठ्या प्रमाणात होत आहे. कपाशीच्या उत्पादनात यामुळे घट येईल, अशी चिंता कावली येथील शेतकरी प्रदीप केचे यांनी व्यक्त केली.ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची व्यवस्था आहे, ते शेतकरी आपल्या कपाशी या पिकाला सिंचन करीत आहेत. परंतु, कोणतीही बदल या पिकांमध्ये दिसत नाही. शेतकऱ्यांनी महागडी औषधी खरेदी केली व त्याची फवारणीसुद्धा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अतिवृष्टीच्या तडाख्यात सोयाबीन गेल्यानंतर कपाशीवर शेतकऱ्यांची भिस्त आहे.

# शहरात कलम ३७ (१) व (३) लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलिस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे.

हे प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून १८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२४ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी कळविले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही अधिसूचना निर्गमित करण्यात आल्याचे पोलिस आयुक्तालयाने कळविले आहे.

# शासकीय वसतिगृहाच्या इमारतीसाठी प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८दर्यापूर :** येथील मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी भाडेतत्वावर इमारत आवश्यक आहे. यासाठी इमारती मालकांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे दर्यापूर येथील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह चालविण्यात येते.या वसतिगृहासाठी १०० मुलींच्या वास्तव्याच्या दृष्टीने निवासासाठी खोल्या, स्नानगृह, स्वच्छतागृह, १० विद्यार्थिनींमागे एक असणे गरजेचे आहे. तसेच स्वयंपाकगृह, भोजनकक्ष, वाचनकक्ष, संगणकक्ष, मनोरंजन कक्ष, गृहपाल, अधिक्षक निवासस्थान, पाण्याची व्यवस्था अशा सर्व सुविधांनी युक्त सुसज्ज अशी इमारत दर्यापूर येथे भाडेत्वावर देण्यास इच्छुक असणाऱ्यांनी १२५ वी जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, बनोसा, दर्यापूर येथे संपर्क साधावा.


# तिवसा विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## एसडीओंनी दिली माहिती : आचारसंहिता पाळण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८तिवसा :** नोव्हेंबर महिन्यात होऊघातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे प्रशासनाकडून निवडणूकविषयक कामांची सर्वतोपरी तयारी पूर्ण झाली. तेव्हा निवडणूक काळात कुठेही आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा सहायक उपजिल्हाधिकारी मिन्नू पी.एम. यांनी पत्रपरिषदेतून केले.

विधानसभा निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबर रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. २९ ऑक्टोबरपर्यंत नामनिर्देशन सादर करायचे आहेत. ३० ऑक्टोबर रोजी प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी होणार असून, ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. २० नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. ही प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी,यासाठी शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी एसएसटी, एफएसटी, व्हीएसटी व व्हीव्हीटीच्या पथकांचे गठण करण्यात आले आहे.



त्याचप्रमाणे निवडणूकविषयक माहिती जाणून घेण्यासाठी विविध पोर्टल उपलब्ध असल्याची माहिती मिन्नूपी.एम. यांनी दिली. तहसीलदार मयूर कळसे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शिवदास मुसळे, बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विनोद बोरसे, नायब तहसीलदार आशिष नागरे व अशोक काळीवकर उपस्थित होते.

### नवीन प्रशासकीय इमारतीत मतमोजणी

तिवसा तहसीलच्या आवारात नवीन प्रशासकीय इमारतीची निर्मिती युद्धपातळीवर सुरू आहे.मतपेट्यासांठी स्ट्राँग रूमची व्यवस्था व मतमोजणी याच इमारतीत राहील.


नवमतदारांची वाढलोकसभा निवडणुकीनंतर तिवसा विधानसभा मतदारसंघात मतदारांमध्ये वाढ झाली. नवमतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. एकूण मतदारसंख्या २ लाख ९५ हजार २७७ आहे. १ लाख ५० हजार ८०९ पुरुष व १ लाख ४४ हजार ४६५ महिला मतदारांचा समावेश आहे. तिवसा मतदारसंघात लेहगाव, वरखेड व कौंडण्यपूर येथे चेकपोस्ट आहेत.

# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी, विषयांची संख्या वाढणार, शाळेत जास्त वेळ बसावं लागणार

## विद्यार्थ्यांना सात, आठ नाही तर तब्बल १५ विषयांचा अभ्यास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती :** हल्ली शालेय विद्यार्थ्यांसमोर जेवढे अभ्यासाचे ओझे नसेल, तेवढे दप्तराचे आहे, असे गंमतीने बोलले जाते. दरवर्षी हे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी शाळा सुरू होण्याअगोदर सरकार, शाळा, पालक सगळ्यांमध्ये एकच चर्चा असते ती विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे वजन... वर्षानुवर्षे होणाऱ्या चर्चा या कागदोपत्रीच राहणाार असल्याचे दिसत आहे. कारण नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमात मोठा बदल होणार आहे.आता विद्यार्थ्यांना सात, आठ नाही तर तब्बल १५ विषयांचा अभ्यास करावा लागणाार आहे. विषय वाढल्याने शाळांची वेळ देखील वाढण्याची शक्यता आहे.



आतापर्यंत नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सात ते आठ विषय होते. मात्र नव्या आरखड्यानुसार यामध्ये भर पडल्याचे वृत्त लोकसत्ताने प्रसिद्ध केले आहे. व्यावसायिक शिक्षण, कला शिक्षण आणि आंतरविद्याशाखा विषय बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच तीन भाषा,विज्ञान, गणित, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि नव्याने समाविष्ट करण्यात आलेले तीन असे दहा विषय असणार आहे. याशिवाय स्काऊट, गाईड हे देखील बंधनकारक तरण्यात आले आहे.

**नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदल**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदल केला आहे. हा बदल करताना भारतीय भाषांची सक्ती करण्यात आली आहे. तसेच मुख्य विषयांचा ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे, याबाबत विचार केला गेला आहे. आता यासंदर्भात शाळांकडून सूचना आल्यानंतर त्याचा अभ्यास करुन हा निर्णय लागू करण्यात येणार आहे. व्यावसायिक शिक्षणामध्ये नववीसाठी विद्यार्थ्यांना शेती, नळ दुरूस्ती, सौंदर्य या व्यवसायांची ओळख करून देण्यात येईल तर दहावीला बागकाम, सुतारकाम, परिचर्या या व्यवसायांची ओळख करून देण्यात येईल. कलाशिक्षणात दृश्यकला, नाट्य, संगीत, नृत्य, लोककला या सर्वांची ओळख करून देण्यात येईल. या विषयाला श्रेणी देण्यात येईल. सादरीकरण, शिक्षकांचे निरिक्षण, विद्यार्थ्यांचे स्वयंमूल्यमापन, गट कामगिरी, कल्पकता याआधारे मूल्यमापन करण्यात येईल.

**कोणते विषय असणार?**

दहावीमध्ये दोनऐवजी तीन भाषांची सक्ती असणार आहेत. त्यातील दोन भाषा भारतीय असणे आवश्यक आहे. तसेच अकरावी-बारावीत एक ऐवजी दोन भाषांचा अभ्यास करावा लागणार आहे. त्यातही एक भारतीय भाषा असणार आहे. तसेच नववी-दहावीत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी विषयांची संख्या वाढवली आहे. पाच ऐवजी दहा विषय शिकावे लागणार आहेत. त्यात तीन भाषा तर सात मुख्य विषय असणार आहेत. या विषयांमध्ये गणित, संगणक शास्त्र, सामाजिक शास्त्र, विज्ञान, कला शिक्षण, शारीरिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि पर्यावरण शिक्षण यांचा समावेश आहे.

# मुख्यमंत्री शिंदेंची भेट घेतली का? बच्चू कडू उत्तर देताना म्हणाले...

## '४ नोव्हेंबरला मोठा स्फोट होणार'राणा दांपत्यावरही केली जोरदार टिका



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८नागपूर :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. एकीकडे महाविकास आघाडी आणि महायुतीत सामना रंगणार असून तर दुसरीकडे प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी तिसऱ्या आघाडीच्या माध्यमातून वेगळी चूल मांडल्याचे चित्र आहे. त्यातच बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतल्याची माहिती समोर आली होती. याबाबत आता बच्चू कडू यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

बच्चू कडू म्हणाले की, महाविकास आघाडी आणि महायुती दोघांनाही जनता कंटाळली आहे. दोन्ही युती-आघाडीत जागावाटपामध्ये तिढा आहे. भाजप आणि काँग्रेस एकच आहेत. अर्थकारणात काही बदल झालेला नाही. आम्ही मुद्द्यावर लोकांना घेऊन जाऊ. चार तारखेला पूर्ण चित्र स्पष्ट होईल आणि मोठा स्फोट होईल. ४ नोव्हेंबरला स्पष्ट होईल, महाशक्ती हा स्फोट करणार आहे, असे वक्तव्य त्यांनी केले आहे.

चांगले उमेदवार आणि चांगले मतदार संघ आमच्याकडे आलेले दिसणार आहेत. युती आणि आघाडी या दोघांना पहिले पाडायचे आहे. जरांगे पाटील यांच्या संबंधात माझे काही बोलणे झाले नाही. उमेदवारांच्या ताकदीपेक्षा राजकारण महत्त्वाचे आहे. ४ नोव्हेंबरला सगळं स्पष्ट होईल आणि मोठा स्फोट पाहायला मिळणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतरच पिक्चर क्लिअर होईल. माझ्या मतदारसंघातील लोकांचा माझ्यावर विश्वास आहे आणि मी तिथूनच लढणार, असे म्हणत बच्चू कडूंनी विधानसभेसाठी शड्डू ठोकला.

**रवी राणा यांच्यामुळेच नवनीत राणा खासदार होऊ शकल्या नाहीत**

अलीकडेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांचा पराभव झाला. अमरावतीच्या जागेवरून बच्चू कडू नाराज असल्याची चर्चा होती. यानंतर आता बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा रवी राणा आणि नवनीत राणा यांच्यावर टीका केली. नवनीत राणा यांना खुद्द रवी राणा यांनी खासदार होऊ दिले नाही. नवनीत राणा या खासदार होऊ नये, याला रवी राणा हेच जबाबदार आहेत. एखाद्याला निवडणूक लढायची असते तेव्हा सगळ्यांना समजून घ्यायला हवे, असा टोला बच्चू कडू यांनी लगावला. तसेच अमरावती येथील सगळ्या भाजपाच्या नेत्यांशी रवी राणांनी वैर घेतले होते. त्यांच्याशी वाद घातला होता. त्यामुळेच नवनीत राणा यांचा पराभव झाला. आता विधानसभेला काय होते ते बघा, असे बच्चू कडू यांनी सांगितले.

**मी मुख्यमंत्र्यांच्या घरी गेलोच नव्हतो**

मुख्यमंत्री शिंदेंची भेट घेतली का? असे विचारले असता बच्चू कडू म्हणाले की, मुख्यमंत्र्यांशी माझी चर्चा झाल्याची न्यूज तुम्ही चालवली. भेट कशी झाली मला माहिती नाही, मी मुख्यमंत्र्यांच्या घरी गेलोच नव्हतो, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. तर आम्ही आघाडी आणि युती दोघांचाही एन्काऊंटर करणार, असेही बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

# कर्नाटकातून अमरावतीत आलेला दहा लाखांचा भेसळयुक्त खवा जप्त

## अन्न व औषधी प्रशासनाची दबंग कार्यवाही ३५०० किलो खवा ताब्यात; नमुने प्रयोगशाळेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

सणासुदीच्या काळात लोकमत न्यूज नेटवर्क खाद्यपदार्थांमधील भेसळीचे प्रमाण वाढते. त्यामुळे अन्न व औषधी प्रशासन अधिक सतर्कतेने याकडे लक्ष ठेवून असते. या पार्श्वभूमीवर, दिवाळीच्या तोंडावर कर्नाटकातून अमरावतीत आलेला ३५०० किलो भेसळयुक्त खवा ज्याची किंमत अंदाजे दहा लाख रुपये आहे. तो अन्न व औषधी प्रशासनाने छापा टाकून जप्त केला.

अन्न व औषधी प्रशासन या प्रकरणी कारवाई करत असून नागरिकांनी याबाबत सतर्कता बाळगावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. कर्नाटक व गुजरात राज्यांतून मोठ्या प्रमाणावर अवैध व भेसळयुक्त अन्नपदार्थ शहरात पोहोचल्याची माहिती अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांना मिळताच गुरुवारी अन्न व औषधी प्रशासनाने शहरातील जुना बायपास मार्गावरील भागातील चैतन्य कॉलनीतील दिनेश रामराव नागपुरे यांच्या गोदामावर छापा टाकून सहआयुक्त रामभाऊ चौव्हाण यांच्या मार्गदर्शनात कारवाई केली. यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी संदीप सूर्यवंशी, जिल्हा दुग्ध विभागाचे विनोद पाठक, पशुधन विकास अधिकारी तुषार गावंडे, तसेच फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी उपस्थित होते.



**कर्नाटकातून थेट अमरावतीत नकली खवा**

सध्या सणासुदीचे दिवस असल्याने मिठाईमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाहेरील राज्यांतून भेसळ पदार्थ अमरावतीत पोहोचविण्याकरिता विक्रेते नवनवीन शक्कल लढवितात. मागील वर्षी खासगी बसद्वारे शहरात येणारा खवा पकडला गेल्याचे पाहून यावर्षी विक्रेत्यांनी थेट गोडावूनपर्यंत चारचाकीने खवा मागविला.

# हरभरा, गहू, सूर्यफुलासह ६ पिकांच्या हमीभावात घसघशीत वाढ

## खासदार डॉ अनिल बोंडे यांनी मानले मोदी सरकारचे आभार : शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी केंद्राचा महत्त्वपूर्ण निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकत मोदी सरकारने २०२५-२६ हंगामासाठी रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत घसघशीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. रेपसीड, मोहरी,मसूर, हरभरा, गहू,सूर्यफूल आणि बार्ली या पिकांच्या 'एमएसपी' मध्ये वाढ करण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. शेतकरी हिताच्या या निर्णयाबद्दल भारतीय जनता पार्टीचे अमरावती चे जिल्हाध्यक्ष व राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे यांनी मोदी सरकारचे आभार मानले आहेत.



डॉ बोंडे यांनी पत्रकात म्हटले आहे की , केंद्र सरकारने २०२५-२६ हंगामासाठी रब्बी पिकांचे हमीभाव नुकतेच घोषित केले आहेत. यामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत रेपसीड आणि मोहरीच्या एमएसपी मध्ये ३०० रु. तर मसूरच्या एमएसपी मध्ये २७५ रु. प्रति क्विंटल अशी घसघशीत वाढ करून शेतक-यांना दिलासा दिला आहे. त्याचप्रमाणे हरभरा पिकाच्या एमएसपी मध्ये २१०, गहू १५०, सूर्यफूल १४० आणि बार्ली पिकाच्या एमएसपी मध्ये १३० रु. प्रति क्विंटल वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पिकांच्या सरासरी उत्पादन खर्चाच्या किमान १.५ पट पातळीवर एमएसपी निश्चित करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला अनुसरून या ६ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य भाव देऊन त्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या उद्देशाने घेतलेला हा महत्त्वपूर्ण निर्णय , केंद्रातील एनडीए सरकारची शेतक-यांप्रति असलेली कटीबद्धता दर्शवते असेही डॉ अनिल बोंडे यांनी पत्रकात नमूद केले आहे.

# आचारसंहितेत अडकले शासकीय योजनांचे लाभार्थी

## लाभार्थी हिरमुसले : लाडक्या बहिणींचेही पोर्टल झाले बंद

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

जिल्ह्यातील आठ ही विधानसभा क्षेत्रातील हजारो नागरिकांनी शासनाच्या विविध योजनांसाठी अर्ज दाखल केले होते. बहुचर्चित लाडक्या बहिणींसह विविध योजनांचा पात्र अर्जदारांना लाभही मिळाला. मात्र, मंगळवारी (दि. १५) निवडणूक आचारसंहिता लागल्याने जिल्हा प्रशासनाने पुढील कार्यवाही थांबवली. त्यामुळे आता नवीन सरकार स्थापन होईपर्यंत अर्जदारांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.







विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याने आंदोलन व मोर्चावर निर्बंध आले. सार्वजनिक ठिकाणे, धरणे, आंदोलने, निदर्शने व उपोषण करण्यास प्रतिबंध घालण्यात आले.

**कामगारांची नोंदणी बंद**

समाजकल्याणच्या वतीने जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी सुरू होती. १४ ऑक्टोबरपर्यंत सहायक कामगार आयुक्त कार्यालयात जिल्हाभरातील कामगारांची प्रचंड गर्दी दिसून आली. मात्र, हजारो कामगारांची नोंद होऊ शकली नाही. विधानसभा निवडणूक आचारसंहितेमुळे ही नोंदणी थांबविण्यात आली. कामगारांना देण्यात येणारी संसारोपयोगी भांडी व बोनसही थांबला.

**लाडक्या बहिणींचे अर्ज स्वीकारणे थांबविले**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी नव्याने अर्ज स्वीकारणे आता बंद करण्यात आले आहे. यापूर्वी मंजूर झालेल्या लाभार्थीना नोव्हेंबरअखेरचे मानधन देण्यात आले आहे. अर्ज करण्याचे पोर्टल बंद झाले.जिल्हातील हजारो पात्र लाभार्थी बहिणींना अर्ज करण्यासाठी राज्यातील नवीन सरकारची वाट पाहावी लागणार आहे.

**दिवाळी बोनसचे काय?**

बांधकाम कामगार योजनेसाठी नव्याने अर्ज करण्याचे मार्ग बंद झाले. त्यांना देण्यात येणारी भांडी व दिवाळी बोनस वितरणही थांबवण्यात आला. वयोश्री व तीर्थदर्शन योजनेलाही ब्रेक लागला. व्यक्तिगत लाभाच्या अनेक योजना तात्पूरत्या बंद झाल्या. काही योजनांचा लाभ सुरू ठेवण्याबाबत जिल्हा प्रशासनाने निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन मागविणार असल्याची माहिती सूत्राने दिली.

# सामान्यांना महागाईची; इच्छुकांना उमेदवारीची चिंता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ वरुड**

सर्वसामान्यांना महागाई कमी होईना म्हणून तर इच्छुकांना आपले नाव यादीत केव्हा येईल? याची चिंता सतावत आहे. दुसरीकडे इच्छुकांची संख्या प्रत्येक पक्षात वाढलेली बघायला मिळत आहे. एकंदर आत्तापासूनच इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत.

राज्य सरकारने लाडक्या बहिणींना महिन्याला दीड हजारांची ओवाळणी देऊन खुश केले. मात्र, लाडक्यादाजीच्या सोयाबीन व तुरीला भाव मिळत नसल्यामुळे मुख्यमंत्र्यांची 'लाडकी बहीण' खुश, त्तर महागाईने दाजीचा खिसा होतोय



रिकामा, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अचानक सर्वच क्षेत्रांत महागाई वाढली. यामुळे सामान्यांच्या खिशाला कात्री बसत आहे. सध्या सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीसाठी सज्ज झाले आहेत, पण महागाईवर कोणीच बोलण्यास तयार नाही. प्रत्येक पक्षात इच्छुकांची संख्या फुगलेली आहे. उमेदवारीसाठी इच्छुक जीवाचा आटापिटाही करत आहेत. काहींनी लोकसभा निवडणुकीपासूनच मतदारसंघातील गावांचे दौरे सुरू केले आहेत.तर काही आता कामाला लागले आहेत मात्र कार्यकर्त्यांची चांगलीच व्यवस्था नेतेमंडळी करतांना दिसत आहे.

मतदारसंघात मतदारांच्या गाठीभेटी घेणे, त्यांचे प्रश्न सोडविणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आदी कामे ते नेटाने करू लागले आहेत. ऐनवेळी उमेदवारी न मिळालेले इच्छुक बंडखोरी करण्याची शक्यता आहे. विधानसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बंडखोरांचे पीक प्रत्येक पक्षात पाहायला मिळणार आहे. उमेदवारी न मिळालेले इच्छुक पक्षनिष्ठा पाळतात की, आपली वेगळी चूल मांडतात, हे येणाऱ्या काही दिवसातच कळणार आहे.

# पंधरा दिवसांत पिंजून काढावे लागणार क्षेत्र; उमेदवार व कार्यकर्त्यांना लावावा लागणार जोर : कार्यकर्ते लागले कामाला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, आता निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार, २२ ऑक्टोबरपासून निवडणूक अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार असून, ४ नोव्हेंबर अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. यानंतरच उमेदवारांचे चित्र स्पष्ट होणार असून, ५ तारखेपासून प्रचाराचा धडाका सुरू होणार, म्हणजेच १७ दिवसांत उमेदवारांना आपापल्या



क्षेत्रातील गावे पिंजून काढावी लागणार आहेत.

**प्रचार होणार हायटेक**

प्रचार म्हटला की, पूर्वी हातात झेंडे, पत्रके किंवा वाहनांवर भोंगे लावून प्रचार केला जात होता. आता तो प्रकार संपल्यात जमा आहे. जमाना हायटेक झाला आहे. जुन्या पद्धतींना बाजूला सारून आता कार्यकर्ते स्मार्ट सिस्टीमचा अवलंब करू लागले आहेत. स्मार्ट फोनच्या माध्यमातून सर्वजण फेसबुक हँडल करीत आहेत.

दुसरे म्हणजे, सध्या व्हॉट्सअॅप संवाद साधण्याचे अतिमहत्त्वपूर्ण माध्यम बनले आहे. या व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न असतो. याचा मोठ्या प्रमाणात प्रचारास वापर होणार आहे.